रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड मंगळवार । दि. ४ ऑगस्ट २०२६ । अंक ५९ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## डोंगरावर अडकलेल्या तरुणांची सुटका

**पनवेल :** ट्रेकिंगसाठी गेलेल्या सहा तरुणांची पनवेल तालुका पोलिसांनी तत्परता दाखवत सुखरूप सुटका केली. अंधार पडल्याने कल्हे गावाजवळील डोंगर परिसरात वाट चुकलेल्या या तरुणांनी आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून त्यांना सुरक्षित खाली आणले. मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली, खांदा कॉलनी, रोडपाली, खारघर आणि सीवूड परिसरातील आयुष संदीप गुप्ता, वेदांत किरण दिवेकर, वेदांत नितीन नाईक, आदित्य जयराम राय, पान २ वर

## पंकजा मुंडेंना काँग्रेसकडून ऑफर

**मुंबई :** भाजपच्या नेत्या आणि राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी अलीकडेच केलेल्या ''राजकारणातून रिटायर व्हावंसं वाटतंय'', या भावनिक वक्तव्यानंतर नव्या चर्चांना सुरुवात झाली. त्यांच्या या विधानानंतर काँग्रेसने मोठी राजकीय चाल खेळत पंकजा मुंडे यांना भाजप सोडून काँग्रेसमध्ये येण्याची आणि महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याची खुली ऑफर दिली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना पंकजा मुंडे यांना थेट आवाहन केले. तसेच, काँग्रेस त्यांना पूर्ण पाठिंबा देईल आणि नेतृत्वाशी चर्चा करून योग्य निर्णय घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### वेधक

## खड्ड्याने घेतला जवानाचा बळी

**कल्याण :** शहापूर तालुक्यातील भारंगी नदीच्या पुलाजवळ खड्ड्यात दुचाकी आदळून झालेल्या अपघातात ठाणे पथकातील जवान विकास लहू गोरे (३१) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने पुन्हा एकदा प्रशासनाचा भोंगळ कारभार समोर आला असून, त्यात सर्वसामान्यांचा बळी जात असल्याने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बामणे गावचे रहिवासी असलेले विकास गोरे हे सकाळी कर्तव्य बजावण्यासाठी कामावर निघाले होते. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी भिवंडीतील कोहिनूर इमारत दुर्घटनेत त्यांनी जीवाची बाजी लावून बचावकार्य केले होते.

## बीएसएनएलच्या कार्यालयामधून चोरी

**रायगड :** बीएसएनएलच्या रिमोट स्टेशन कार्यालयामधून ४८ बॅटरींची चोरी झाली आहे. त्यामध्ये ९६ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील बस स्थानकाच्या मागील भागात बीएसएनएलच्या रिमोट स्टेशन कार्यालय आहे. दि.२६ जानेवारी ते २४ एप्रिल या चार महिन्यांच्या कालावधीत चोरटे कार्यालयाच्या खिडकीतून आत घुसले. त्यानंतर आतमध्ये असलेल्या एचबीएल कंपनीच्या ४८ बॅटऱ्यांची चोरी त्यांनी केली. ही बाब तक्रारदार यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी पोयनाड पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला.

# गौण खनिज चोरीचा 'विक्रम'?



- **पंचनामे झाले, नोटिसा निघाल्या; तरीही वसुलीकडे दुर्लक्ष?**
- **अलिबाग तहसीलदारांच्या निलंबनाची मागणी**

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील कुरकुंडी-कोलटेंभी येथे झालेल्या कथित बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन प्रकरणाची आता रितसर चौकशी होणार आहे. या प्रकरणामुळे शासनाचा महसूल तसेच पर्यावरणाचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला असून, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची तक्रार स्थानिक नागरिक सचिन पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची रितसर चौकशी करून अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या चौकशीत महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका नेमकी काय होती, याची तपासणी होणार आहे. कुरकुंडी-कोलटेंभी परिसरातील कथित बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन, माती-मुरुम व दगडांच्या उपशाबाबत तक्रार करण्यात आली होती. संबंधित ठिकाणी अनधिकृत उत्खनन होत असताना ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी योग्य वेळी कारवाई केली नाही, असा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारदाराच्या निवेदनानुसार, कुरुकुंडी-कोलटेंभी येथील सर्व्हे नं. ११९/१/अ, १६४, ११७, १७८/२ आणि १७९ या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गौण खनिजांचे बेकायदेशीर उत्खनन झाले आहे. माती, मुरुमाचा भराव तसेच दगडांचा विनापरवाना उपसा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला असून, संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून उत्खननाचे प्रमाण निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. पान २ वर

### जीपीएस मॅपसह पुरावे दिल्याचा दावा

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, १५ मे रोजी तहसीलदार कार्यालयाकडे जीपीएस मॅप असलेली छायाचित्रे, इतर फोटो आणि संबंधित पुरावे सादर करण्यात आले होते. माती व मुरुमाचा कथित विनापरवाना उपसा झाल्याचे या पुराव्यांमधून निदर्शनास आणून दिल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. मात्र, घटनास्थळी प्रत्यक्ष पंचनामा न करताच माती चोरी झालेली नाही किंवा तसे दिसून येत नाही, अशा स्वरूपाचे उत्तर देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली होती का, उपलब्ध पुराव्यांची तपासणी कशी करण्यात आली, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

### तहसीलदारांची होणार चौकशी

कुरकुंडी-कोलटेंभी येथील बेकायदेशीर गौण खनिज उत्खननामुळे शासनाचा महसूल व पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व तहसीलदार यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याची तक्रार सचिन पाटील यांनी महसूल मंत्र्यांकडे केली होती. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी रितसर चौकशी करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

# भाजप उपाध्यक्षांचा प्रताप!



**खंडणी, मारहाण अन् रिव्हॉल्वरचा धाक**

**भाजपचे मंगेश दळवींसह चौघांवर पेणमध्ये गंभीर गुन्हा**

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील कुरमुर्ली येथे खंडणी, मारहाण, जबरी चोरी आणि रिव्हॉल्वरचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष मंगेश रघुनाथ दळवी यांच्यासह अन्य तिघांविरुद्ध पेण पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पेण पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास कुरमुर्लीयेथील फिर्यादी मयूर केसरीनाथ वनगे यांच्या फार्महाऊसमध्ये ही घटना घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, पूर्वीच्या वैमनस्यातून मंगेश रघुनाथ दळवी, हरेश कृष्णा दळवी, रूपेश कृष्णा दळवी आणि रंजीत दळवी (सर्व रा. मांगरूळ) यांनी लोखंडी रॉड, पाईप, लाकडी दांडका आणि लोखंडी तलवारीचा वापर करून फिर्यादीला मारहाण केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत करत आहेत. दरम्यान, गुन्हा दाखल पान २ वर

> मंगेश दळवी यांच्यावर यापुर्वीदेखील अनेक गुन्हे नोंद आहेत. त्यांच्याविरोधात कुणीही बोलण्यास धजावत नाही. त्यांनी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल व्हावा. अन्यथा माझ्यासारख्या अनेकांच्या जीवास धोका आहे.
>
> – मयुर वनगे, पिडित तक्रारदार

### कुटुंबाला ठार मारण्याची धमकी?

यापुढे आमच्या नादी लागल्यास तुझ्यासह संपूर्ण कुटुंबाला ठार मारू, अशी धमकी आरोपींनी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य आणखी वाढले आहे. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तळोज्यात ड्रग्जविरोधी कारवाईचा धक्का

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने तळोजा परिसरातील ओम साई रेसिडेन्सी लॉजवर धडक कारवाई केली. या कारवाईत लॉजवर अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असल्याच्या संशयावरून एका युगुलाला अटक करण्यात आली. तसेच, २९ ग्रॅम गांजा व चार मोबाईल फोन असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेली महिला मूळची पंजाब येथील असल्याचे समोर आले आहे. पंजाबमधून नवी मुंबईत गांजाची वाहतूक करणाऱ्या साखळीशी तिचा संबंध असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पान २ वर

## घोडीवलीतील घराची भिंत कोसळली

- **संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान; कुटुंबियांवर आर्थिक संकट**

। खालापूर । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसाचा फटका ग्रामीण भागाला बसला आहे. यादरम्यान, घोडीवली येथे एका घराची भिंत कोसळल्याची घटना घडली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, घरातील संसारोपयोगी वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घोडीवली येथील कल्पना दशरथ पिंगळे यांच्या घराची भिंत सोमवारी (दि.३) अचानक कोसळली. त्यावेळी घरात दोन लहान मुले होती. मोठा आवाज झाल्याने दोन्ही ते तात्काळ घराबाहेर धावत आल्याने संभाव्य अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच शेजारी व ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कुटुंबीयांना सुरक्षित स्थळी हलवले. घराची भिंत कोसळल्यामुळे घरातील धान्य, कपडे, भांडी, फर्निचर तसेच अन्य संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे घराचा उर्वरित भागही धोकादायक स्थितीत असून, आणखी नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर नुकसानग्रस्त कुटुंबाने शासनाकडे तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. संबंधित विभागाने परिस्थितीची पाहणी करून नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीची मदत जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# जि.प. सभेत ५१ शाळांचा सौदा?



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत शाळांच्या जागा, जलजीवन मिशनमधील कामे, आरोग्य व्यवस्था आणि प्रशासनाच्या कारभारावरून सत्ताधारी सदस्यांनीच प्रशासनाला धारेवर धरले. विशेषतः पनवेलमधील जि.प.च्या तब्बल ५१ शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या निर्णयावरून सभागृहात प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. पनवेल परिसरातील जमिनींच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या असताना या शाळांच्या जागा योग्य मोबदला न घेता पालिकेकडे हस्तांतरित करण्याचा घाट का, असा सवाल काही सत्ताधारी सदस्यांनी उपस्थित केला. हा निर्णय सभागृहाला विश्वासात न घेता परस्पर कसा घेण्यात आला? तसेच, शाळांच्या नावाखाली असलेल्या मौल्यवान जागांचा भविष्यात बिगरशैक्षणिक कारणांसाठी वापर झाला तर त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. पनवेलमधील जमिनींचे वाढते बाजारमूल्य लक्षात घेता जि.प.ला या जागांचा योग्य आणि बाजारभावानुसार मोबदला मिळाला पाहिजे, अशी पान २ वर

### इतिवृत्तात 'गोंधळ'?

जिल्हा परिषदेच्या सभेचे इतिवृत्त वेळेवर सदस्यांना उपलब्ध होत नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. विशेष म्हणजे सभागृहात चर्चा किंवा उल्लेख न झालेल्या बाबींचाही इतिवृत्तात उल्लेख केला जात असल्याचा आरोप काही सदस्यांनी केला. इतिवृत्त तयार करताना शुद्ध लेखनाचा अभाव असल्याचे सांगत इतिवृत्त शिक्षकांकडून माहिती करून घ्यावे, असा टोलादेखील संबंधित अधिकाऱ्यांना लगावला. इतिवृत्तातील चुका आणि शुद्धलेखनाच्या त्रुटी सभागृहाच्या निदर्शनास आणून देताना सदस्यांनी अधिकाऱ्यांना चांगलाच टोला लगावला. इतिवृत्त तयार करताना शिक्षकांकडून माहिती करून घ्या, असा उपरोधिक सल्लाही देण्यात आला.

### राष्ट्रवादीचे प्रतोद मागच्या बाकावर

रायगड जिल्हा परिषदेच्या नव्या सभागृहाचे उद्घाटन सोमवारी झाले. त्याच दिवशी या सभागृहात सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये राष्ट्रवादीचे प्रतोद अमित नाईक यांना शेवटून तिसऱ्या क्रमाकांच्या रांगेत बसविण्यात आले. त्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर त्यांना पहिल्या रांगेत बसण्याची संधी दिली. दरम्यान, जिल्हा परिषद सदस्यांसह सभापतींच्या खुर्चीवर सत्ताधारी सदस्यांच्या खासगी पीए आणि रिल्स काढणाऱ्यांनी कब्जा केला होता. त्यामुळे काही वेळ खुर्चीत बसण्यावरून वादच सुरु होता.

# ५० फूट दरीत मृत्यूचा थरार

। खालापूर । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील गारमाळ रस्त्यावर सोमवारी (दि.३) सकाळी थरारक अपघात घडला. कनेक्टिंग लिंकवरील पुलाचे विहंगम दृश्य पाहण्याच्या मोहापायी चालकाने कार कच्च्या रस्त्यावर नेली आणि अचानक नियंत्रण सुटल्याने कार तब्बल ५० फुट खोल दरीत कोसळली. चार ते पाच पलट्या खात कार दरीत कोसळल्याने घटनास्थळी उपस्थितांनी चालकाच्या बचावाची आशाच सोडली होती. मात्र, महामार्ग पोलिसांनी दाखविलेल्या धाडस आणि प्रसंगावधानामुळे चालकाला अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून बाहेर खेचण्यात यश आले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र, पान २ वर

**चार-पाच पलट्यानंतरही चालक बचावला**



### दरीत उतरले अन् जीव वाचवला

कार खोल दरीत कोसळल्याने चालक नेमका कोणत्या अवस्थेत आहे, याची माहिती मिळत नव्हती. अशा परिस्थितीत पोलिसांनी दोरखंड व स्थानिकांच्या मदतीने दरीत उतरत कारपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. अखेर कारमध्ये अडकलेल्या चालकाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. बचावकार्यानंतर चालकाला तातडीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## बिहारमधील भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग

। बांकीपूर । वृत्तसंस्था ।

बिहारमधील बांकीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी गेली तीन दशके भाजपाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मतदारसंघातच भाजपाला मोठा धक्का दिला आहे. या जागेसाठी दि.३० जुलै रोजी मतदान झाले होते. त्यानंतर सोमवारी (दि.३) पाटण्यातील एएन कॉलेजमध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतमोजणी पार पडली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच प्रशांत किशोर यांनी आघाडी कायम ठेवली होती. २८व्या फेरीअखेर त्यांना ५९ हजार २१३ मतं मिळाली, तर भाजपाच्या निरज कुमार यांना ३९ हजार ७९४ मत मिळाली.

**जमीन घोटाळ्यांवर सरकारची करडी नजर | परस्पर जमिनी विकणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी**

# वारस नसणाऱ्या जमिनी होणार सरकार जमा

- **वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती होणार स्थापन**
- **दोषी अधिकारी अन् संबंधितांवर कठोर कारवाई करणार**

। रायगड । प्रतिनिधी ।

कृषीवलच्या प्रतिनिधींनी रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील मिळकतखार येथील जमीन तलाठी आणि अधिकाऱ्यांनी कुळ लावून लाटल्याचे चित्र पत्रकार संवादामध्ये महसूल मंत्र्यांसमोर ठेवले. तसेच, अशा महसूल कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करणार, असे विचारले होते. त्यावर कोकणातील कथित जमीन घोटाळ्यांवर राज्य सरकार मोठी कारवाई करण्याचे महसूल मंत्र्यांनी संकेत दिले आहेत. परस्पर जमिनींची विक्री, महसूल नोंदीतील अनियमितता आणि सरकारी ताब्यात जाणे अपेक्षित असलेल्या जमिनींच्या प्रकरणांची सखोल चौकशी केली जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महसूल प्रशासनाला अंधारात ठेवणाऱ्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

रायगड जिल्ह्यात पत्रकारांशी औपचारिक संवाद साधताना मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, या प्रकरणांच्या चौकशीसाठी १५ वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती पुढील दोन ते तीन महिन्यांत कोकणात दाखल होऊन विविध प्रकरणांची तपासणी सुरू करणार आहे. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई करणार, असा इशाराही त्यांनी दिला. महसूल विभागातील पारदर्शकता वाढविणे आणि बेकायदेशीर जमीन व्यवहारांना आळा घालणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, कोकणात हजारो-लाखो जमीन व्यवहारांमध्ये अनियमितता झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी मालक नसलेल्या जमिनी नियमानुसार सरकारी जमा होणे आवश्यक असताना तसे झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. तसेच, तलाठी आणि मंडळ अधिकारी स्तरावरही गंभीर स्वरूपाचे गैरप्रकार घडल्याचे प्राथमिक तपासातून समोर आल्याचे त्यांनी सांगितले. अशा जमिनींची तपासणी करून त्या जमिनी सरकार जमा कराव्यात अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्या आहेत.

सरकारच्या या निर्णयामुळे कोकणातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमीन घोटाळ्यांची प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत असून, महसूल विभागातील गैरप्रकारांवर मोठा अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, अलिबाग तालुक्यातील मिळकतखार येथील कथित जमीन घोटाळ्यात सामील असणाऱ्या तलाठी आणि तत्कालीन अधिकाऱ्यांवर तडकाफडकी बदलीचे आणि खातेनिहाय चौकशीचे आदेश महसूल मंत्र्यांनी दिल्यानंतर तत्कालीन कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे महसूल प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे.

# रिल्सचा मोह जिवावर बेतला

**मृतदेह आठ तासांच्या शोधमोहिमेनंतर बाहेर**



। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोलीजवळील केपी वॉटरफॉल परिसरात रिल्स चित्रीकरणासाठी गेलेल्या ठाण्यातील २३ वर्षीय अभिषेक कुशवाह याचा रविवारी (दि.२) दरीत कोसळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मुसळधार पाऊस, दाट अंधार आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्थानिक युवक, हेल्प फाऊंडेशनचे स्वयंसेवक आणि खोपोली पोलिसांनी रात्रभर शोधमोहीम राबवून सोमवारी (दि.३) पहाटे तरुणाचा मृतदेह बाहेर काढला.

मिळालेल्या माहितीनुसार, अभिषेक कुशवाह (२३) हा मित्रांसह केपी वॉटरफॉल परिसरात फिरण्यासाठी आला होता. सायंकाळच्या सुमारास धबधब्याजवळ तोल जाऊन तो खोल दरीत कोसळला. त्याच्यासोबत असलेल्या मित्रांनी रात्री उशिरा ठाकूरवाडीतील ग्रामस्थांकडे धाव घेत मदतीची याचना केली. घटनेची माहिती मिळताच ठाकूरवाडीतील युवकांनी घटनास्थळ गाठले. त्याचबरोबर हेल्प फाऊंडेशनचे सुनील पुरी यांनी गुरुनाथ साठेलकर यांच्याशी संपर्क साधत खोपोली पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर सुनील पुरी, गुरुनाथ साठेलकर, सौरभ घरत, योगेश औटी, निखिल ढोले यांच्यासह स्वयंसेवक आणि स्थानिक युवकांनी रात्रीच शोधमोहीम पान २ वर

# शेतरस्ते होणार अतिक्रमणमुक्त




■ खासगी जमिनींवरील वन शिक्के हटणार
■ हजारो कुटुंबांना मिळणार मालकी हक्क

**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील शेतकरी, आदिवासी, भूमिहीन, सर्वसामान्य नागरिक आणि ग्रामीण भागातील रहिवाशांसाठी मोठा दिलासा देणारे अनेक निर्णय राज्य शासनाने जाहीर केले आहेत. महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने महसूल मंत्र्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विशेष आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षांच्या प्रलंबित प्रश्नांवर महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदुलकर, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या खासगी जमिनींवर अनेक वर्षांपासून असलेले वन विभागाचे शिक्के हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय बैठकीत घेण्यात आला. यासाठी लवकरच शासन निर्णय जारी करण्यात येणार असून, संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरील पूर्ण मालकी हक्क पूर्ववत मिळणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून अडकलेले व्यवहार, बँक कर्जे, वारसा नोंदी आणि शेती विकासाची कामे मार्गी लागण्याची आशा निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील तब्बल ७० हजार एकर क्षेत्रावरील कलम ३५ च्या नोटिसा रद्द करून नागरिकांना वनविषयक अडचणींमधून मुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, ११ हजार हेक्टर जमीन कांदळवन क्षेत्रात गेल्याने निर्माण झालेल्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नवीन कायदा आणण्याची घोषणा महसूल मंत्र्यांनी केली. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना अंतर्गत जिल्ह्यातील २ हजार ९५० शेतरस्त्यांना सांकेतिक क्रमांक देऊन त्यांचे मोजमाप करण्यात येणार आहे. ३१ मार्च २०२७ पर्यंत हे सर्व रस्ते अतिक्रमणमुक्त करून शेतकऱ्यांसाठी खुले करण्यात येणार आहेत. त्याशिवाय आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ३ हजार ४९५ शेत पाणंद रस्त्यांव्यतिरिक्त उर्वरित रस्त्यांचाही पुढील तीन महिन्यांत शोध घेऊन सीमांकन करण्यात येणार आहे. प्रत्येक किलोमीटरसाठी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येणार असून, दोन्ही बाजूंना वृक्षलागवडही केली जाणार आहे. या कामासाठी निधीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच, जिल्ह्यात पोटहिस्सा नोंदणीची प्रक्रिया सर्वसामान्यांना परवडणारी करण्यासाठी ती केवळ २०० रुपयांत करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तसेच, या बैठकित अनेक निर्णय घेण्यात आले.

## नेरळ-कशेळे मार्गावर धावली लालपरी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ वाकस मार्गे कशेळे बस सेवा तब्बल १२ वर्षांपासून बंद होती. एसटी बससेवा अखेर सोमवारी (दि.३) पुन्हा सुरू करण्यात आली. या सेवेचे उद्घाटन नेरळ बसस्थानकात झाले. विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळाने ही खास सेवा सुरू केली असून, दररोज या मार्गावर एसटीच्या आठ फेऱ्या असणार आहेत. नेरळ-वाकस-कशेळे मार्गावरील बससेवा बंद झाल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही सेवा पुन्हा सुरू व्हावी यासाठी कर्जत प्रेस असोसिएशन यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या मागणीला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) कर्जत तालुका तसेच किसान क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य कर्जत तालुका यांनी सक्रिय पाठिंबा दिला. विविध स्तरांवर करण्यात आलेल्या प्रयत्नांनंतर एसटी प्रशासनाने तात्काळ निर्णय घेतला. या मार्गावरील पहिली बस सेवा उद्घाटनानंतर पहिली बस फेरी सुरू झाली. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, आगार व्यवस्थापक पृथ्वीराज भुताळे, स्थानिक प्रमुख देवानंद मोरे तसेच सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## तळवडे पुलावरील खड्डे भरले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर असलेल्या तळवडे पुलावर पडलेले प्रचंड खड्डे शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत परिवर्तन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी भरले. तळवडे पुलावरील डांबरी पृष्ठभाग गेल्या अनेक वर्षापासून खड्डेमय बनला होता. त्यामुळे खड्डे भरण्याची मागणी सातत्याने होत वाहनचालक यांना प्रचंड त्रास होत होता. दुचाकी चालक खड्ड्यात पडून अनेक वेळा अपघात झाले आहेत. शेवटी सामाजिक कार्यकर्ते रोहिदास माळी यांनी आपल्या स्वखर्चातून नितीन सावंत यांच्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांच्या मार्गदर्शनातून हे खड्डे भरण्यात आले.

पंजाब अॅण्ड सिंध बँक
(भारत सरकारचा उपक्रम)

पंजाब अॅण्ड सिंध बँक
(भारत सरकारचा उपक्रम)
शाखा - खोपोली (के०२५२) शास्त्रीनगर,
जळगावकर बिल्डींग, खोपोली-४१०२०३
दूरः ०२१९२-२६२२२३, ईमेल आयडीः k0252@psb.co.in

परिशिष्ट IV
**ताबा सूचना**
[नियम-८(१)]
(स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार यांनी **पंजाब अॅण्ड सिंध बँक**चे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२४.०८.२०२३** रोजी मागणी सूचना जारी केली होती व त्याद्वारे कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **श्री. संजय लक्ष्मण पालांडे, लक्ष्मण बालाजी पालांडे यांचा मुलगा, समर्थ कृपा स्नॅक्स, सौ. संजिवनी संजय पालांडे, संजय लक्ष्मण पालांडे यांची पत्नी आणि श्री. समिर विश्वनाथ खरसांबळे** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली **दि. ३१.०७.२०२३ पर्यंतची मुदत कर्जामधील रु. ११,९८,३६५.२२ (रुपये अकरा लाख अठ्याण्णव हजार तीनशे पासष्ट व पैसे बावीस मात्र) अधिक इतर प्रभार आणि दि. ०१.०८.२०२३ पासूनचे व्याज** मासिक शिलकीसह सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत बँकेकडे परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. ३० जुलै, २०२६** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे खबरदार करण्यात येते की, मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेसोबतचा कोणताही व्यवहार हा **पंजाब अॅण्ड सिंध बँक, खोपोली शाखेच्या दि. ३१.०७.२०२३ पर्यंतची मुदत कर्जामधील रु. ११,९८,३६५.२२ (रुपये अकरा लाख अठ्याण्णव हजार तीनशे पासष्ट व पैसे बावीस मात्र) अधिक इतर प्रभार आणि दि. ०१.०८.२०२३ पासूनचे व्याज** आणि त्यावरील व्याज या रकमेच्या प्रभारास अधीन असेल.

**तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या बाबतीत, कायद्याच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

दुकान क्र. १, तळमजला, श्री ईश निवास, शास्त्री नगर, भूखंड क्र. १०७, (सिटी सर्व्हे क्र. ४०८५), ऑ भूखंड क्र. ११० (सर्व्हे क्र. ४८०) येथे स्थित वाणिज्य मालमत्ता, एकूण मोजमाप क्षेत्रफळ २१५ चौ.फू. म्हणजेच १९.९८ चौ.मी., भानवाज तालुका खालापूर, खोपोली, जि. रायगड - ४१०२०३ चे नोंदणीकृत गहाणवट.

**दिनांकः ३०.०७.२०२६**
**ठिकाणः खोपोली**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**पंजाब अॅण्ड सिंध बँक**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १) नरेंद्र राधेश्याम व्यास, २) देवेंद्र राधेश्याम व्यास, यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६३ | ४/अ | ०-२०-०० | ०-१७ |
| ६३ | ४/ब | ०-२०-०० | ०-१७ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०३/०८/२०२६

**अॅड. संदिप ह. मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ऑफीस नं. १०१,
कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला,
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड मो. नं ९६०४५४५७७७

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## पान १ वरून

### गौण खनिज चोरीचा 'विक्रम'?

दरम्यान, तक्रारदाराने केलेल्या आरोपांची स्वतंत्र अधिकृत चौकशी होणे बाकी असून, चौकशीत नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते हे महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रकरणावर महसूल विभाग आणि जिल्हा प्रशासन काय भूमिका घेते, तसेच तहसीलदारांच्या निलंबनाच्या मागणीवर शासन काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

**पंचनामे आणि नोटिसांनंतरही वसुली कुठे?**

काही प्रकरणांत पंचनामे करून संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्याचे कागदपत्रांवरून दिसत असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. मात्र, त्यानंतर अंतिम दंड आकारणी, शासनाच्या महसुलाची वसुली किंवा उत्खनन केलेल्या साहित्याची जप्ती याबाबत ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे महसूल विभागाची कारवाई केवळ कागदोपत्रीच राहिली का, असा सवाल तक्रारदाराने उपस्थित केला आहे.

**महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशीची मागणी**

या प्रकरणात तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी आपल्या वैधानिक जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडल्या आहेत का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदाराने गौण खनिज उत्खननासंबंधी नियम तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक व शिस्त-अपील) नियमांचा संदर्भ देत संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची तपासणी करण्याची मागणी केली आहे.

**निलंबनासह उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

तक्रारदाराने अलिबाग तहसीलदारांना तत्काळ निलंबित करावे, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय विभागीय चौकशी करावी, मूळ अभिलेख, पंचनामे, मोजणी अहवाल आणि इतर कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. तसेच, शासनाच्या महसुलाचे झालेले नुकसान निश्चित करून संबंधितांकडून वसुली करावी आणि चौकशीत फौजदारी स्वरूपाचे कृत्य आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### डोंगरावर अडकलेल्या तरुणांची सुटका

प्रसनजीत कुंदन कांबळे आणि निखिल जयस्वार हे सहा मित्र रविवारी (दि.२) दुपारी उरणमधील रानसई-खैरकुटी येथून ट्रेकिंगसाठी निघाले होते. ट्रेक करत ते कल्हे गावाजवळील डोंगर परिसरात पोहोचले. मात्र, संध्याकाळी अंधार पडल्याने त्यांची दिशा चुकली आणि परतीचा मार्ग सापडेनासा झाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर मदतीसाठी संपर्क साधला. माहिती मिळताच पनवेल तालुक्याचे पोलीस हवालदार संजय दोरगे, पोलीस शिपाई तुकाराम भोये आणि पोलीस पाटील संतोष मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. डोंगराळ परिसर, घनदाट अंधार आणि कठीण वाट यामुळे शोधमोहीम आव्हानात्मक ठरली. मात्र, मोबाईल लोकेशन आणि नकाशाच्या साहाय्याने सुमारे दीड तास शोध घेतल्यानंतर पोलिसांचे पथक सहा तरुणांपर्यंत पोहोचले. त्यानंतर सर्वांना सुरक्षितपणे डोंगरावरून खाली आणण्यात आले.

### भाजप उपाध्यक्षांचा प्रताप!

झाल्यानंतर अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसून, त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत यांनी दिली. दरम्यान, तक्रारीतील आरोपांची पोलीस तपासातून शहानिशा होणार असून, या प्रकरणातील पुढील तपासात नेमकी काय तथ्ये समोर येतात आणि आरोपींवर कोणती कारवाई होते, याकडे पेण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**कपाळावर रिव्हॉल्वर**

मारहाणीनंतर मंगेश दळवी यांनी जवळील रिव्हॉल्वर फिर्यादीच्या कपाळावर रोखून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, रिव्हॉल्वर तोंडात घालून धमकावल्याचेही फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. या घटनेदरम्यान फिर्यादीच्या खिशातून खाली पडलेले ८० हजार रुपये रूपेश दळवी यांनी उचलून घेतल्याचा, तर हरेश दळवी यांनी गळ्यातील सुमारे पाच तोळ्यांची सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### तळोज्यात ड्रग्जविरोधी कारवाईचा धक्का

त्यामुळे या प्रकरणामागे आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीचे जाळे कार्यरत असल्याची शक्यता गृहीत धरून तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. या रॅकेटशी संबंधित इतर संशयितांचा शोध सुरू असून, अमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करण्यासाठी अमली पदार्थविरोधी पथक सखोल तपास करत आहे.

### ५० फूट दरीत मृत्यूचा थरार

बोरघाट येथील प्रभारी अधिकारी स्वप्नील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. दरीत उतरणे अत्यंत धोकादायक असतानाही पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता बचावकार्य सुरू केले. पोलीस कर्मचारी संदीप पवार, किरण शिंदे, भरत पावरा, गणेश खाडे, संतोष गुजरवार आणि गोडसे यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून स्थानिकांच्या मदतीने दरीत उतरून कारमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढले

या अपघातात चालक मोहित स्वरूप भटनागर (वय ५१, रा. गुरुग्राम, हरियाणा) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. कार तब्बल ५० फूट खोल दरीत चार ते पाच पलट्या खात कोसळल्यानंतरही चालक बचावल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. काही क्षणांचा उशीर झाला असता परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र, महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी दाखविलेली तत्परता आणि धाडसी बचाव मोहीम यामुळे एका व्यक्तीचा जीव वाचला. महामार्ग पोलिसांच्या या प्रसंगावधानता, धाडस आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### रिल्सचा मोह जिवावर बेतला

सुरू केली. मात्र, मुसळधार पाऊस, निसरडी वाट, दाट धुके आणि खोल दऱ्यांमुळे शोधकार्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. मध्यरात्रीनंतरही शिवदुर्ग मित्र मंडळाचे सुनील गायकवाड तसेच डेला अॅडव्हेंचर्सचे गणेश गीध यांच्या मार्गदर्शनाखाली शोधमोहीम सुरू ठेवण्यात आली. मात्र, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमुळे पहाटे उजेडात पुन्हा शोध घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या शोधमोहीमेदरम्यान दरीच्या तळाशी गवत दबलेले आढळून आले. त्या दिशेने तपासणी केली असता अभिषेक कुशवाह हा निश्चल अवस्थेत आढळला. त्यानंतर बकेट स्ट्रेचर, दोरखंड आणि इतर साहित्याच्या साहाय्याने अत्यंत कठीण परिस्थितीत मृतदेह दरीतून वर आणण्यात आला. खोपोली पोलीस आणि बचाव पथकाच्या उपस्थितीत मृतदेह खोपोली नगरपालिका रुग्णालयात हलविण्यात आला. त्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

### जि.प. सभेत ५१ शाळांचा सौदा?

भूमिका काही सदस्यांनी मांडली. त्यामुळे ५१ शाळांचे हस्तांतरण हा केवळ प्रशासकीय विषय नसून जिल्हा परिषदेच्या कोट्यवधींच्या मालमत्तेचा प्रश्न असल्याचे सभागृहातील चर्चेतून स्पष्ट झाले.

रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या नव्या सभागृहात ही बैठक पार पडली. या बैठकीत उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, वेगवेगळ्या विभागातील अधिकारी, तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती उपस्थित होते. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राबविण्यात आलेल्या जलजीवन मिशनच्या योजनांचा मुद्दा पुन्हा एकदा सभागृहात गाजला. कामांच्या दर्जाबाबत आणि विभागाच्या कार्यपद्धतीबाबत सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ठेकेदारांना फायदा होईल अशा पद्धतीने नियम व अटी घालून निविदा काढू नयेत, असा स्पष्ट इशारा काही सदस्यांनी दिला. जलजीवनच्या कामांबाबत यापूर्वीही अनेकदा प्रश्न उपस्थित झाले असताना प्रशासनाकडून अपेक्षित सुधारणा होत नसल्याबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी किमान २० टक्के निधी जिल्हा परिषद सदस्यांना त्यांच्या मतदारसंघातील कामांसाठी खर्च करण्याचा अधिकार मिळावा, अशी मागणीही सभागृहात करण्यात आली. एकूणच, ५१ शाळांच्या हस्तांतरणापासून जलजीवनच्या कामांपर्यंत आणि शाळा-आरोग्य सुविधांपासून भरावामुळे निर्माण होणाऱ्या पुराच्या संकटापर्यंत अनेक प्रश्नांवरून जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा चांगलीच गाजली.

**झोनच्या कचाट्यात रायगडकर**

रायगड जिल्ह्यातील विविध झोन आणि परवानगी प्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे सर्वसामान्य नागरिकांना साधे घर बांधणे किंवा जुन्या घराची दुरुस्ती करणेही कठीण झाले असल्याचा मुद्दा सभेत उपस्थित करण्यात आला. जिल्हा प्रशासनासह सिडको आणि इतर यंत्रणांकडून परवानग्या मिळण्यात येणाऱ्या अडचणींमुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे या प्रश्नावर सर्व संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली.

**३०५ कोटीच्या आराखड्याला विरोध**

रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागांतर्गत पुर परिस्थितीसाठी ३०५ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला. या आराखड्याविरोधात काही सत्तेतील सदस्यांनी विरोध दर्शवित आराखड्याला नामंजूरी दर्शविली. सदस्यांना विश्वासात घेऊन ठराव मंजूर करावा असे काही सदस्यांनी सांगितले.

**सभापतींच्या बोलण्याकडेच सभागृहाचे दुर्लक्ष**

रायगड जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा सोमवारी (दि.३) दुपारी जिल्हा परिषदेच्या सभागृहात घेण्यात आली. या सभेत जिल्हा परिषदेचे मोजकेच सदस्य बोलत होते. मात्र, पंचायत समितीचे सभापती काहीच बोलत नव्हते. सत्ताधारी पक्षातील दोनच जिल्हा परिषद सदस्य वेगवेगळ्या विषयांवर बोलतील. सभापतींनी काहीच बोलू नये असे सांगण्यात आले होते. मात्र, त्यातील काही सभापतींनी नाराजी व्यक्त करीत आम्हाला बोलू द्या, अशी हाक मारली. मात्र, व्यासपिठांवरील पदाधिकारी यांनी त्यांच्या बोलण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. त्या सभापतींनी त्यांचा मुद्दा मांडला. परंतु, त्या मुद्यांना सभागृहाने कितपत गंभीरपणे घेतले, याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकाराबाबत सत्तेतील सभापतींचा अपमान सत्ताधाऱ्यांकडून झाल्याचे चित्र सभागृहात दिसून आले.

**ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड**
**जाहीर नोटीस**

जा.क्र. ८१५/२०२६
दिनांक : २/०८/२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ५ | १०९७/२४ | संकुल सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४३२ चौ. फुट | अजित भिकाजी म्हात्रे, आसावरी यतिन मोकल, युगंधी रविंद्र म्हात्रे भिकाजी भिवा म्हात्रे | आसावरी यतिन मोकल |
| २ | ४ | १७९५/५ | सिगल सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ४६५ चौ. फुट | टेकलाल कुमार मेहता | अमेय दिलीप नाईक |
| ३ | २ | २१७१/१६ | अॅकॉन्स प्रिव | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला ३५.७८ चौ.मी. | अंकीता कन्स्ट्रक्शन तर्फे अक्षय अरूण गुलाटी | दिपाली संदीप पाटील संदीप रविंद्र पाटील |
| ४ | ६ | १०१२/७ | प्रभात दर्पण सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६०० चौ. फुट | विरेंद्र शांताराम पाटील | सुर्यकांत चंद्रकांत म्हात्रे |
| ५ | ४ | १३१० | बुरूड सोसा. गोंधळपाडा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ११०० चौ. फुट घर | सुप्रिया रविंद्र सोंडकर व इतर ३ | केसरीनाथ काशिनाथ पाटील मिना केसरीनाथ पाटील |
| ६ | ५ | २१५३/२ | सद्गुरू कबीर भवन सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६४७ चौ. फुट | सद्गुरू कबीर भवन तर्फे संजय वैजनाथ मेहता | नवनीता महेंद्र महाडिक महेंद्र राजेंद्र महाडिक |
| ७ | २ | २१६९/२९ | अॅकॉन्स प्रिव | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला ५३९ चौ. फुट | अक्षय अरूण गुलाटी | प्रशांत ज्ञानेश्वर गावंड |
| ८ | २ | २१६९/२८ | अॅकॉन्स प्रिव | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला ३८१ चौ. फुट | अक्षय अरूण गुलाटी | प्रशांत ज्ञानेश्वर गावंड |
| ९ | १ | १७/५ | समर्थ सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५५० चौ. फुट | राजीव नथुराम शेरमकर कस्तुरी राजीव शेरमकर | सुरेखा गणेश बिर्जे |
| १० | ५ | ९१५/५ | सुजलाम नगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५०२ चौ. फुट | नंदकुमार लक्ष्मण भायजे | निता नंदकुमार भायजे |
| ११ | २ | २११७/१८ | अॅकॉन्स प्रिव | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला ३८९ चौ. फुट | अक्षय अरूण गुलाटी | मिलिंद मधुकर घरत |
| १२ | ३ | ११५९ | गोकुळनगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम घर चौ. फुट | वसंत रघुनाथ पाटील | वनिता वसंत पाटील व इतर ३ |
| १३ | ५ | १६६०/११ | कृष्णदर्शन सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ६६५ चौ. फुट | रविंद्र मुकुंदा वाघळे | स्मिता मित्र पाटील |
| १४ | २ | १८१५/१ | निलकंठ हाईट | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३३० चौ.फुट | सुजाता सुनिल निकम | सुनिल लक्ष्मण निकम |
| १५ | २ | १२१/१० | महेश क्लासिक | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ५१७ चौ. फुट | नरेश टोपणदास ऐदासानी | धनश्री सत्यजित शिंदे |
| १६ | ४ | २१२६/२,३ | मैत्र रेसिडेन्सी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला २३.१६ चौ.मी. | किशोर रामचंद्र भातखंडे | मनिषा विकास पाटील |
| १७ | ६ | ७३९/११ | आदित्य सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४७० चौ. फुट | अलका अनंत पंडित अनंत श्रीधर पंडित | वंदना विनयचंद्र पंडित |
| १८ | २ | १८१२/१ | अलिबाग वन | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६१२ चौ. फुट | स्वप्निल विलास रणदिवे सिया स्वप्निल रणदिवे | रोहिणी रामभाऊजी मुघाटे |
| १९ | २ | २११७ | अॅकॉन्स प्रिव | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ३५.०५ चौ.मी. | अक्षय अरूण गुलाटी | माधुरी अजित पाटील |
| २० | ४ | ९६३/६ | सुर्यप्रभा सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५४२चौ. फुट | किशोर विष्णू पाटील श्रद्धा कि. पाटील | वैष्णव जयवंत पाटील |
| २१ | ५ | २१५३/५ | सद्गुरू कबीर सागरभवन | आर.सी.सी. दुसरा मजला ६२० चौ. फुट | संजय बै. मेहता रंजितकुमार बै. मेहता | पवन शालिकराम देवकाते स्वाती पवन देवकाते |

**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
ग्रामपंचायत अधिकारी

# निवडक

## रेल्वे स्थानकाचा होणार कायापालट

**चणेरो :** कोकण रेल्वेवरील महत्त्वाचे रोहा रेल्वे स्थानक सुमारे २५ कोटी रुपयांच्या निधीतून अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात येणार आहे. या पुनर्विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने खासदार सुनील तटकरे यांनी रेल्वे प्रशासनासोबत आढावा बैठक घेऊन प्रस्तावित आराखड्याची माहिती घेतली. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. नव्या आराखड्यानुसार स्थानकात आकर्षक प्रवेशद्वार, वातानुकूलित प्रतीक्षागृह, सुसज्ज स्वच्छतागृहे, दिव्यांगांसाठी स्वतंत्र सुविधा, आधुनिक वाहनतळ आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तसेच स्थानकाबाहेरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ५० ते ६० रिक्षांची क्षमता असलेले स्वतंत्र रिक्षा पार्किंग उभारण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांसह रिक्षाचालकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी खासदार तटकरे यांनी पेण रेल्वे स्थानकाचाही स्थानिक सांस्कृतिक वारशाला साजेशा संकल्पनेतून पुनर्विकास करण्यात येणार असल्याची माहिती दिली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रोहा रेल्वे स्थानकाचा चेहरामोहरा बदलून प्रवाशांना अधिक सुरक्षित, आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

- **२५ कोटींच्या निधीतून उभारणार अत्याधुनिक प्रवासी केंद्र**
- **२ ऑक्टोबरपासून पुनर्विकासाच्या कामाला प्रारंभ**

## दिग्दर्शक विजू माने यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखी भेट

**पनवेल :** मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय दिग्दर्शक विजू माने यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलकरांसाठी एक आगळीवेगळी भेट देण्यात आली. समाजसेवक राकेश जाधव यांच्या वतीने 'मामाच्या गोव्याला जाऊया' या बहुचर्चित मराठी चित्रपटाचा मोफत शो आयोजित करण्यात आला. या उपक्रमामुळे चित्रपटप्रेमींना विनामूल्य चित्रपट पाहण्याची संधी मिळाली आणि कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पनवेल येथील ओरियन मॉलमधील चित्रपटगृहात हा विशेष शो आयोजित करण्यात आला होता. शो सुरू होण्यापूर्वीच चित्रपटप्रेमींनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. कुटुंबासह आलेल्या अनेक प्रेक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले. ३१ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित झालेला मामाच्या गोव्याला जाऊया हा चित्रपट सध्या राज्यभरात प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करत आहे. मैत्री, कौटुंबिक नातेसंबंध आणि विनोदी प्रसंगांनी भरलेला हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आकर्षित करत आहे.



## नवीन पनवेलमध्ये नागरी समस्या

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरातील नागरी समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, महापालिकेचे अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक १७ मध्ये मूलभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रभागातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, त्यांच्या दुरुस्तीची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याची तक्रार आहे. खड्ड्यांमध्ये केवळ खडी टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जात असल्याने काही दिवसांतच ते पुन्हा उघडे पडतात. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे स्थानक आणि बसस्थानक या दोन्ही महत्त्वाच्या सुविधा या प्रभागात असल्याने वाहनांच्या पार्किंगची समस्या गंभीर बनली आहे. अनियोजित पार्किंगमुळे वाहतूक कोंडी नित्याची झाली असून, नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. याशिवाय सेक्टर १३ येथील उद्यानात बेकायदेशीर मटण विक्री, रेल्वे स्थानक सेक्टर १७ परिसरातील फूटपाथवर सुरू असलेले अनधिकृत खाद्यपदार्थांचे स्टॉल, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि वाढती वाहतूक कोंडी या समस्यांनी नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, या गंभीर प्रश्नांवर महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिकेच्या सभागृहात या प्रश्नांवर ठोस भूमिका न मांडता पक्षाची बाजू व नेत्यांचे गुणगान गात जास्त गातांना दिसत आहेत. मात्र, नागरिकांच्या मते या नागरिक मूलभूत प्रश्नांवर अपेक्षित पाठपुरावा होताना दिसत नसल्याने लोकप्रतिनिधींविषयी नाराजी वाढत आहे. आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

- **प्रभाग १७ मधील नागरिकांचा संताप**

# रायगड जिल्ह्यातील १२,६८२ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती

## ● आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

**| माणगाव | प्रतिनिधी |**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील १२ हजार ६८२ पात्र शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ७ हजार ५४४ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. मात्र, लाभासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य असल्याने उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील १२ हजार ६८२ पात्र शेतकऱ्यांची माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ७ हजार ५४४ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे. मात्र, आतापर्यंत केवळ १ हजार ९८० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून, उर्वरित लाभार्थ्यांनी विलंब न करता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

शासनाने व्यापारी बँकांना अनुत्पादित (एनपीए) कर्जखात्यांवर आवश्यक ती सवलत देण्याचे निर्देश दिले असून, १ जुलै २०२६ पासून पात्र कर्जखात्यांवर अतिरिक्त व्याज आकारू नये, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे गावपातळीवरील यादी आणि पोर्टलवरील थकबाकीत तफावत असल्यास पोर्टलवरील रक्कमच ग्राह्य धरण्यात येणार आहे.

पहिल्या यादीत दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या कर्जखात्यांचा समावेश करण्यात आला असून, उर्वरित पात्र शेतकऱ्यांचा पुढील टप्प्यात समावेश केला जाणार आहे. तसेच वेळेत पीककर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कमही देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य असून, महा-ई-सेवा केंद्रे व सीएससी केंद्रांवर ही सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी केले आहे.

## तोडलेल्या झाडांच्या फांद्या फूटपाथवरच

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका हद्दीत पावसाळ्यात तोडलेल्या झाडांच्या फांद्या नवीन पनवेल सेक्टर ५, ८, ९ १० परिसरातील फुटपाथवरच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या झाडांच्या फांद्या लवकरात लवकर उचलाव्यात, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.



तोडलेल्या झाडांच्या फांद्या अनेक ठिकाणी फुटपाथवरच टाकून देण्यात आल्याने पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. येथील फुटपाथ तोडलेल्या फांद्यांनी अडवल्यामुळे नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. पनवेल महापालिकेकडून किंवा संबंधित ठेकेदारामार्फत झाडांची छाटणी केल्यानंतर फांद्या तात्काळ उचलून नेणे अपेक्षित असते. मात्र अनेक ठिकाणी दिवसेंदिवस या फांद्या फुटपाथवरच पडून असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तर फांद्यांचे मोठे ढिगारे झाल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे फुटपाथवरील फांद्या तातडीने हटवून फुटपाथ मोकळे करण्याची मागणी केली आहे.

## ती हत्या नव्हे तर, तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द येथे अमित राय या तरुणाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी मे महिन्यात अज्ञाताविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला होता. मात्र, पोलीस तपासात ही हत्या नसून तो तरुण खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अमित राय या तरुणाचा मृतदेह उसर्ली खुर्दजवळील रेल्वे पुलाच्या कामाच्या ठिकाणी दोन पिलरच्या मधोमध आढळून आला होता. त्याचा डोळ्यांमध्ये भोसकल्याच्या खुणा दिसून आल्याने पनवेल शहर पोलिसांनी अज्ञाताविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला होता.

## मुंबई-पुणे द्रुतगतीवर दरोडेखोरांचा धुमाकूळ

**| पनवेल | प्रतिनिधी |**

- **दगडफेक, हल्ले आणि लुटमारीने चालकांमध्ये भीती**
- **कळंबोली-खालापूर पट्टा ठरतोय हॉटस्पॉट**
- **गस्त वाढविण्याची ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांची मागणी**

देशातील सर्वाधिक सुरक्षित आणि वेगवान महामार्गांपैकी एक मानल्या जाणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दरोडेखोरांच्या टोळ्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र समोर येत आहे. रात्रीच्या वेळी वाहनांवर दगडफेक करून ती थांबवणे, चालकांना मारहाण करून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, मोबाईल आणि इतर मौल्यवान वस्तू लुटून पसार होणे, अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः कळंबोली सर्कल ते खालापूर टोलनाका आणि खालापूर ते कळंबोली या संपूर्ण पट्ट्यात अशा घटनांचे प्रमाण वाढल्याने अनेक वाहनचालकांनी या मार्गाला चोरीचा महामार्ग अशी उपमा दिली आहे. वाहनचालकांच्या माहितीनुसार, अमिटी विद्यापीठ परिसर, भाताण बोगदा आणि कोन गाव एक्झिट हे दरोडेखोरांच्या हालचालींचे प्रमुख ठिकाण बनले आहेत. रात्री उशिरा किंवा पहाटे वाहतूक कमी होताच टोळ्या सक्रिय होतात. मालवाहू ट्रक, कंटेनर, खासगी चारचाकी तसेच व्यावसायिक वाहने हेरून त्यांच्यावर अचानक दगडफेक केली जाते. वाहनाच्या काचा फुटल्यानंतर किंवा चालक घाबरून वाहन थांबवताच चार ते सहा जणांची टोळी वाहनात घुसून चालकाला मारहाण करते. त्यानंतर गळ्यातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल आणि इतर मौल्यवान वस्तू लुटून आरोपी सेवा रस्ते किंवा झाडीचा आधार घेत काही मिनिटांत पसार होतात. या प्रकारात अनेक चालक जखमी झाल्याची माहिती समोर येत असून, आरोपी घटनास्थळावरून झटपट पसार होत असल्याने त्यांचा माग काढणे पोलिसांसमोरही मोठे आव्हान ठरत आहे.

या प्रकारची घटना भाताण बोगद्याजवळ घडली. पुण्यातून ट्रक घेऊन मुंबईकडे निघालेल्या अर्जुन यादव यांच्या वाहनावर अज्ञातांनी दगडफेक केली. दगड त्यांच्या हाताला आणि गालाला लागल्याने त्यांनी वाहन थांबवले. त्याच क्षणी चार अज्ञात व्यक्ती ट्रकमध्ये घुसल्या. त्यांनी यादव यांना मारहाण करून त्यांच्याकडील सुमारे पाच हजार रुपये रोख, सोन्याची बाली आणि इतर वस्तू लुटून पलायन केले. घटनेनंतर चालकाने पोलिसांशी संपर्क साधला. मात्र, घटनास्थळ कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते, याची पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येईल, असे सांगण्यात आल्याची माहिती चालकाने दिली.

### गस्त वाढविण्याची मागणी

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अमिटी विद्यापीठ, खालापूर टोलनाका, भाताण बोगदा आणि कोन गाव एक्झिट परिसरात डिझेल चोरी, दरोडे आणि लुटमारीच्या घटना वारंवार घडत असल्याचा आरोप ट्रान्सपोर्ट व्यावसायिक तुकाराम सरक यांनी केला आहे. या ठिकाणी स्थानिक पोलिसांनी नियमित गस्त वाढवून दरोडेखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे वाहनचालकांमध्ये निर्माण झालेली भीती कमी होऊन महामार्गावरील सुरक्षाही अधिक बळकट होईल.

## एचपी गॅस ग्राहकांना ई केवायसी बंधनकारक

**पनवेल :** एचपी गॅस ग्राहकांना ई केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ग्राहकांनी ई केवायसी पूर्ण केली नाही तर गॅस सिलिंडर मिळण्यात अडथळा येऊ शकतो किंवा पुरवठा बंद होऊ शकतो. ग्राहकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, नोंदणीकृत मोबाईल नंबर, ग्राहकाचा फोटो घेऊन ई-केवायसी करणे आवश्यक आहे. त्यामुळे लवकरात लवकर एचपी गॅस ग्राहकांनी ई केवायसी करून घेणे आवश्यक असल्याचे आरडी एचपी गॅसचे खांदा कॉलनी येथील राम ढोबळे यांनी म्हटले आहे.

## पाण्याचा मार्ग रोखल्याने शेतकरी उद्ध्वस्त

### किसान क्रांती संघटना आक्रमक

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील मालवाडी येथे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचरा रोखल्यामुळे एका शेतकऱ्याची भातपेरणी पाण्याखाली जाऊन उद्ध्वस्त झाली. या प्रकरणाची दखल घेत किसान क्रांती संघटनेने आक्रमक भूमिका घेत घटनास्थळी पाहणी केली. संघटनेच्या हस्तक्षेपानंतर संबंधित जमीनमालकाने नुकसानभरपाई देण्यासह पाण्याच्या निचऱ्यासाठी कायमस्वरूपी जलवाहिनी उभारण्याचे आश्वासन दिले.



तालुक्यातील मालवाडी येथील शेतकरी जितेंद्र गणपत लेकुरवाले यांच्या शेतातील पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक मार्ग शेजारील जमिनीच्या कुंपणामुळे बंद झाल्याने संपूर्ण भातशेती पाण्याखाली गेली. तसेच शेताकडे जाणारा वहिवाटीचा रस्ताही बंद झाल्याने ट्रॅक्टरसह शेतीची कामे करणे अशक्य झाले. यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या अन्यायाविरोधात लेकुरवाले यांनी किसान क्रांती संघटनेकडे धाव घेतल्यानंतर जिल्हाध्यक्ष भरत राणे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. संघटनेने आक्रमक भूमिका घेतल्यानंतर संबंधित जमीनमालकाने शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यास तसेच भविष्यात पाणी साचू नये यासाठी कायमस्वरूपी जलवाहिनी उभारण्याचे नियोजन करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख रामदास माळी, तालुकाध्यक्ष शरद तवळे, प्रवक्ते सुरेश खानविलकर तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

> **शेताकडे जाणारा वहिवाटीचा रस्ता बंद करण्यात आला. तसेच पावसाचे पाणी बाहेर जाण्याचा मार्ग अडवल्यामुळे माझी संपूर्ण भातपेरणी पाण्याखाली जाऊन खराब झाली. अनेकदा विनंती करूनही दखल घेतली गेली नाही. अखेर किसान क्रांती संघटनेकडे धाव घेतल्यानंतर माझ्या समस्येची दखल घेऊन मला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.**
> **- जितेंद्र लेकुरवाले, शेतकरी**

## अज्ञात इसमाचा आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विसावा रिसॉर्टच्या मागील डोंगरावरील झुडपांमध्ये एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी अकस्मात मृत्यू दाखल केला असून, मृताची ओळख पटविण्यासाठी नागरिकांचे सहकार्य मागितले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून, अंगाने मध्यम बांधा, गोल चेहरा, काळे केस, छातीवर टिळा गोंदलेला तसेच उजव्या हातावर लाल रंगाचा दोरा आहे.

## अलिबागची विरा राज्यात अव्वल

### अहिल्यानगरमध्ये होणार ९ ऑगस्टला अंतिम फेरी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

छोट्या वयात मोठ्या रंगमंचावर आत्मविश्वासपूर्ण अभिनयाची छाप पाडत अलिबागच्या विरा प्रशांत नरबेकर हिने राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. 'इतिहास महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धेतील हे यश अलिबागच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद मानले जात आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संलग्न बालरंगभूमी परिषद



९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर येथे होणार आहे.

ऐरोली येथील न्यू युरो स्कूलच्या रंगमंचावर झालेल्या या स्पर्धेत राज्यभरातील बालकलाकारांनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट अभिनय, प्रभावी संवादफेक आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर विराने परीक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचे परीक्षण डॉ. लता पाडेकर आणि कल्पना गोसावी यांनी केले, तर लेखक, दिग्दर्शक व अभिनेते रवी वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. बालरंगभूमी परिषदच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के, विजय चौगुले, शुभम चौगुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी अभिनेत्री ॲड. नीलम शिर्के यांनी विराचे कौतुक केले.

> **हा पुरस्कार माझ्यासाठी खूप प्रेरणादायी आहे. अंतिम फेरीतही सर्वोत्तम सादरीकरण करून अलिबागचे नाव उंचावण्यासाठी मी पूर्ण प्रयत्न करेन.**
> **- विरा नरबेकर**



## शहरातील रस्त्यांवरील खड्डे, शेवाळामुळे अपघाताचा धोका

### ● तातडीने उपाययोजनांची शिवसेनेची मागणी

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा शहरातील विविध ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे तसेच काही ठिकाणी रस्त्यांवर साचलेल्या शेवाळामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे म्हसळा शहर प्रमुख अभय सुधाकर कुलमकर यांनी म्हसळा नगरपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगराध्यक्ष व मुख्याधिकारी, म्हसळा नगरपंचायत यांना दिलेल्या निवेदनात शहरातील अनेक भागांत रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक व पादचारी यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यावर शेवाळ साचल्याने नागरिक घसरून अपघात होण्याचा धोका वाढला असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. नागरिकांच्या जीविताची सुरक्षितता लक्षात घेऊन नगरपंचायतीने तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शहरवासियांकडून व्यक्त होत आहे. याप्रसंगी दक्षिण रायगड जिल्हा अल्पसंख्यांक उपाध्यक्ष शौकत हजवाने, अभय कळमकर, दीपल शिर्के, नवमान वजगरे, शहर समन्वयक फहद पठाण, शहर संघटक अंकुश नटे, उपविभाग प्रमुख किसन म्हात्रे, समीर लांजेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

## अलिबागच्या विद्यार्थिनीची आयआयएसटीमध्ये निवड | जिद्द, मेहनत, वैज्ञानिक दृष्टिकोनाला यश

# अंतराळाकडे स्वराची भरारी

**| चौल | प्रतिनिधी |**

रायगडच्या मातीतून उंच भरारी घेत अलिबागच्या स्वरा भाग्यश्री अविनाश पाटील हिने देशातील सर्वात प्रतिष्ठित भारतीय अंतराळ विज्ञान संस्थांपैकी एक असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी (आयआयएसटी), तिरुवनंतपुरममध्ये प्रवेश मिळवत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या बळावर मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.



अलिबाग येथील स्वरा पाटील हिने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी (आयआयएसटी), तिरुवनंतपुरम येथे बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग अभ्यासक्रमासाठी निवड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

लहानपणापासूनच विज्ञान, गणित आणि अंतराळ संशोधनाची आवड असलेल्या स्वराला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या १०० सॅटेलाईट मिशन आणि १५० सॅटेलाईट मिशन या राष्ट्रीय उपग्रह निर्मिती मोहिमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. राज्य आदर्श शिक्षक तथा कोअर कमिटी सदस्य डॉ. संदीप दत्तात्रेय वारगे यांच्या मार्गदर्शनाखाली तिने उपग्रह तंत्रज्ञान आणि अवकाश विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

> **अंतराळ संशोधन क्षेत्रात काम करण्याचे माझे स्वप्न आहे. आई-वडील, शिक्षक आणि मार्गदर्शक यांच्या पाठिंब्यामुळे हे यश मिळाले. पुढेही देशासाठी योगदान देण्याचा माझा प्रयत्न असेल.**
> **- स्वरा पाटील**

स्वराच्या या यशाबद्दल नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपशिक्षणाधिकारी सुनीता चांदोरकर, डॉ. संदीप वारगे, अमोल पोतदार तसेच आयसीडीएस अधिकारी भाग्यश्री पाटील यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ९ हजार ५३२ शिधापत्रिका रद्द

**पनवेल :** शासनाच्या धान्य योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी मिशन सुधार अंतर्गत राज्यभर विशेष पडताळणी मोहीम राबवण्यात येत आहे. यात पनवेल तालुक्यातील ९ हजार ५३२ अपात्र शिधापत्रिका धान्य योजनेतून वगळण्यात आल्या आहेत. या मोहिमेदरम्यान अपात्र लाभार्थी, मृतांची नावे, स्थलांतरित कुटुंबे तसेच दुबार नोंदी शोधून त्यांची नावे वगळण्यात आली आहेत. तालुक्यात अंत्योदय योजनेचे ६ हजार ७०० पेक्षा अधिक शिधापत्रिका आहेत, तर प्राधान्य गटाचे ६७ हजार पेक्षा जास्त शिधापत्रिका आहेत. ग्रामीण भागात वार्षिक उत्पन्न ४४ हजार आणि शहरी भागात ५९ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्यास धान्य बंद होणार आहे.

# आंदोलनाची पुढची दिशा

दिल्लीतील यशस्वी आंदोलनानंतर विद्यार्थ्यांकडून आता मोठ्या अपेक्षा केल्या जात आहेत. मोदी सरकारला नमवण्याचा पराक्रम केल्यामुळे आता हे सरकार त्यांनी उलथूनच टाकावे असे अनेकांना वाटत आहे. काही जणांच्या मते त्यांनी आता शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचे आंदोनन हाती घ्यावे. तर अनेकांना हे आंदोलन आता रोजगार किंवा अधिक मूलभूत प्रश्नांकडे जावे असे वाटते. आंदोलनाची पुढची दिशा ठरवण्यासाठी उद्या बुधवारी संभाजीनगरला सीजेपीच्या नेत्यांची बैठक अभिजीत दीपके यांच्या घरी होणार आहे. त्यात काय बाहेर येते ते कळेलच. पण ही सगळी तरुण मुले आहेत. दीपकेसकट बहुतेक सर्व लोक आपली करियर घडवण्याच्या मागे होते. खुद्द दीपके याने आपण अमेरिकेत नोकरी शोधत होतो, तेवढ्यात सरन्यायाधीशांनी झुरळाची कॉमेंट केली आणि पुढचा सगळा प्रकार घडला हे सांगितले आहे. सौरव दास हा पत्रकार होता व त्याने न्याययंत्रणेबाबत पुस्तक लिहिले आहे. इतरही तरुण उच्च शिक्षण घेतलेले असे आहेत. झुरळ जनता पार्टी जन्माला आली नसती तर कदाचित हे लोक कॉर्पोरेटमध्ये नोकऱ्यांसाठी गेले असते. म्हणजे हे काही विचारांनी भारलेले, राजकीय पक्षांमध्ये आंदोलनांमधून तयार झालेले नेते नाहीत. समाजवादी किंवा कोणत्याच विशिष्ट विचारसरणीचा त्यांच्यावर पगडा दिसत नाही. ते पुरेसे प्रागतिक आहेत. धर्माच्या आधारे केल्या जाणाऱ्या राजकारणाला त्यांचा विरोध दिसतो. म्हणूनच तर ते भाजपवर उघड टीका करतात. दिल्लीच्या आंदोलनात केवळ भारतमाता की जय, जय भीम आणि इन्किलाब झिंदाबाद या तीनच घोषणा देण्याचे त्यांनी जाहीर केले होते व जमलेल्या आंदोलकांना त्यांनी ते पाळायला लावले. नीटच्या बाबतीतला अन्याय त्यांना जाणवला व त्यावरची उस्फूर्त प्रतिक्रिया म्हणून धरणे धरले गेले व नंतर संसदेवर मोर्चा काढला गेला. विशिष्ट दिशेने जाण्यासाठी धोरण आखून केलेले ही चळवळ नाही. ही तरुणांची एक उस्फूर्त आणि संतप्त प्रतिक्रिया होती व म्हणूनच देशभरच्या त्यांच्यासारख्याच लाखो तरुणांना ती आपलीशी वाटली. या तरुणांनी आपल्या भाषेमध्ये तिचा प्रसार केला.

### उस्फूर्त, संतप्त उद्गार

अशा या उस्फूर्त, तरुण आंदोलनावर शंभर किंवा हजार वर्षांपासूनच्या भारतातल्या प्रश्नांचे ओझे टाकणे किंवा त्यांची उत्तरे त्यांनी काढून दाखवावीत असे म्हणणे योग्य होणार नाही. अर्थात, समजा बाहेरच्यांनी कितीही व काहीही अपेक्षा केल्या तरी याच तरुणांच्या भाषेत सांगायचे तर त्यांचा लोड हे तरुण घेणार नाहीत. त्यांचा दबाव ते मानणार नाहीत. ते त्यांच्याच वाटेने जातील. अशा वेळी बाहेर काहीही न करता केवळ अपेक्षा करणाऱ्यांचा स्वप्नभंग होण्याची शक्यता आहे. ते असो. दिल्लीचे आंदोलन नीट परिक्षेच्या पेपरफुटीभोवती उभे राहिले. म्हणून त्याला सर्व जातीधर्माच्या मुलांचा पाठिंबा मिळाला. मध्यमवर्गातील मुलेमुलीही त्यात त्वेषाने उतरली. आता पुढचा प्रश्न घेताना आंदोलनाला ही गोष्ट नीट ध्यानात ठेवावी लागेल. पण त्याहीपूर्वी वीस जुलैच्या आंदोलकांवर देशभर जे गुन्हे दाखल झाले आहेत त्यांचा विषय मार्गी लावावा लागेल. याच स्तंभात पूर्वी म्हटल्याप्रमाणे हे गुन्हे मागे घेणार असे सरकार कितीही सांगत असले तरी त्यांची प्रक्रिया पूर्ण होण्यास बरेच दिवस लागणार आहेत. दरम्यानच्या काळात विद्यार्थ्यांचा छळ सुरूच आहे. गोव्यातील अमरीन शेख या विद्यार्थिनीला पोलिसांना तब्बल अडीचशे प्रश्नांची उत्तरे लिहून मागितली. या मुलीने वीस जुलैला पोलिसांची परवानगी घेऊन पणजीमध्ये मोर्चा काढला होता. विशेष म्हणजे ही विद्यार्थिनी पूर्वी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची कार्यकर्ती होती. पण तिचा आणि उमर खालिदचा काय संबंध आहे, त्याचे पोस्टर का लावले, तिने अमुकच घोषणा का दिल्या या प्रश्नांची उत्तरे तिला पोलिसांनी द्यायला लावली. जर मोर्चा परवानगी घेऊन काढलेला असेल, त्यात कोणतीही बेकायदा वा हिंसक गोष्ट घडलेली नसेल, तशा घोषणा दिल्या गेल्या नसतील तर पोलिसांना हे फालतूचे प्रश्न विचारण्याचे काहीच कारण नाही. पण आता नेमके तेच घडते आहे. हा सरळसरळ छळ आहे. विद्यार्थ्यांना घाबरवण्याचा हा प्रकार आहे. अशा प्रकारे वारंवार पोलिस ठाण्याच्या चकरा मारायला लावल्या की हे विद्यार्थी पुन्हा आंदोलनाच्या फंदात पडणार नाहीत असे यामागचे कारस्थान आहे.

### पोलिसी दडपशाहीशी सामना

कोणत्याही राजकीय पार्टीचे कार्यकर्ते हे अशा पोलिसी कारवाईला तयार असतात. पण दिल्ली व देशभरच्या आंदोलनात सहभागी झालेले तरुण हे नवशिके होते. राज्यघटनेने आपल्याला स्वतःचे मत मांडण्याचा आणि मोर्चा काढण्याचा अधिकार दिला आहे यावर त्यांची श्रध्दा आहे. म्हणून तर बहुसंख्य तरुणांच्या हातात बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो होते व जय भीम अशा घोषणा ते देत होते. ती श्रध्दा मोडून काढणे हाच नरेंद्र मोदी, अमित शहा यांचा व त्यांच्या पोलिसांचा उद्देश आहे. त्यामुळे आता आंदोलनाला कदाचित आंदोलन करण्याच्या लढ्यासाठीच ताबडतोबीची एक चळवळ उभारावी लागेल. हे सरकार किती जुलमी आहे ते उघडे पाडावे लागेल. दिल्लीतील अनेक विद्यार्थ्यांना थेट चौकशीला न बोलावता त्यांच्या मूळ गावी त्यांच्या आईवडिलांना पोलिस त्रास देत असल्याच्या तक्रारी आहेत. टू मच डेमॉक्रसी ही शेतकरी आंदोलनावरची डॉक्युमेंट्री करणारा वरूण सुखराज याने अशा मुलामुलींची माहिती दिली आहे. पोलिसांना मुख्यतः डाव्या चळवळींशी संबंधित मुलेमुली खटकत आहेत. त्यांच्यावर त्यांचा राग आहे. भाजपलाही जेएनयू व इतर विद्यापीठातील डाव्या संघटना उखडून टाकायच्या आहेत. दीपके यांच्या आंदोलनात आयसा हा डाव्या कम्युनिस्टांच्या विद्यार्थी संघटनेचा सहभाग होता व त्यांच्या नेहा बोरा वगैरे विद्यार्थिनींनी प्रदीर्घ उपोषणही केले. या सर्वांना मोडून काढणे हा पोलिसांचा हेतू आहे. सर्वोच्च न्यायालयातले एक ख्यातनाम वकील म्हणून कपिल सिब्बल यांना हे चांगले ठाऊक आहे. म्हणूनच त्यांनी अशा मुलांच्या केसेस लढवण्यासाठी मोठा निधी गोळा करण्याचे ठरवले आहे. स्वतः एक कोटी रुपयेही त्यांनी दिले आहेत. पण या केसेस आपल्या कोर्टांमध्ये वर्षानुवर्षे चालत राहू शकतात. त्यांना तोंड देण्यामध्ये तरुणांची उर्जा जाणे योग्य नाही. यासाठी आंदोलनाला या दडपशाहीविरुध्द व हुकुमशहा सरकारविरुध्दच एक जोरदार लढा करावा लागेल अशी चिन्हे आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जसा झाला तसा रेटा तयार करण्याची गरज आहे. हे लगेच होईल असे नव्हे. पण केंद्र सरकारचे एकूण धोरण पाहता, अंतिमतः याच दिशेने बहुदा हा प्रवास करावा लागेल असे दिसते. मधल्या काळात आंदोलनाला भूमिका स्पष्ट करावी लागेल. आपण राजकारणात उतरणार नाही, एक राजकीय पक्ष म्हणून नव्हे तर दबावगट म्हणून काम करू असे दीपके यांनी सूचित केले आहे. इतर नेत्यांची विचारांची दिशा काय आहे हे कळल्यानंतर सर्वांना समन्वयाने जावे लागेल. हे आंदोलन रा. स्व. संघवाल्यांनीच उभे केले आहे असा एक आरोप काही मंडळी करीत आहेत. तोही खोडून काढावा लागेल.

विचार

# एआयचे अर्थपडसाद आणि रेशनकार्डमधील त्रुटी

**कच्च्या तेलाच्या दरवाढीने सरत्या आठवड्यामध्येही अर्थविश्वाचे आभाळ व्यापले होते. मात्र काही वेगळ्या बातम्याही दखलपात्र ठरल्या. सर्वप्रथम कृत्रिम बुद्धिमत्तेवर कडक देखरेखीची गरज कशी आहे, हे अर्थविश्वातून समोर आले. दुसरी बातमी मसाल्यांच्या दरवाढीची होती. या दरवाढीला तात्पुरता ब्रेक लागल्याचे पहायला मिळाले. याच सुमारास २.९१ कोटी रेशन कार्डांमध्ये त्रुटी आढळल्याचे समोर आले.**



महेश देशपांडे

काही वेगळ्या आर्थिक बातम्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये तरंग उमटवले. त्यामुळे त्या दखलपात्र ठरल्या. सर्वप्रथम कृत्रिम बुद्धिमत्तेवर कडक देखरेखीची गरज कशी आहे, हे अर्थविश्वातून समोर आले. दुसरी बातमी मसाल्यांच्या दरवाढीची होती. या दरवाढीला तात्पुरता ब्रेक लागल्याचे पहायला मिळाले. याच सुमारास २.९१ कोटी रेशन कार्डांमध्ये त्रुटी आढळल्याचे समोर आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आर्थिक क्षेत्रात झपाट्याने वापरली जात असताना तिच्यावर अधिक प्रभावी नियामक नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचा इशारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ)ने जगभरातील मध्यवर्ती बँकांना दिला आहे. 'एआय'मुळे शेअर बाजारातील व्यवहार, कर्जवाटप आणि वित्तीय देखरेखीच्या पद्धतीत मोठे बदल होत असले, तरी योग्य व्यवस्थापन न झाल्यास प्रणालीगत धोके आणि सायबर हल्ल्यांचा धोका वाढू शकतो, असे आयएमएफने स्पष्ट केले आहे. सामान्य बाजारस्थितीत 'एआय'चे परिणाम सकारात्मक असतात. 'एआय'-आधारित ट्रेडिंगमुळे बाजारातील तरलता वाढते, व्यवहाराचा खर्च कमी होतो आणि शेअर किंवा मालमत्तेच्या किमतींचे अचूक मूल्यांकन अधिक वेगाने करता येते; मात्र बाजारात तणाव निर्माण झाल्यास हीच वैशिष्ट्ये मोठा धोका निर्माण करू शकतात. 'एआय'मुळे बाजार अधिक वेगवान आणि परस्परांशी अधिक जोडला जात असल्याने अस्थिरता वाढण्याची शक्यता असते. 'आयएमएफ'च्या मते, भविष्यात शेअर बाजारात अचानक होणारी मोठी घसरण केवळ संगणकीय प्रोग्राममधील त्रुटींमुळेच होणार नाही, तर अनेक 'एआय' प्रणाली एकाच वेळी समान माहितीचे विश्लेषण करून एकसारखी प्रतिक्रिया देऊ लागल्यासही ती घडू शकते. यामुळे मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी खरेदी किंवा विक्रीचे आदेश दिले जाऊ शकतात आणि बाजारात तीव्र चढ-उतार निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वित्तीय क्षेत्रातील एआयच्या वापरावर काटेकोर देखरेख ठेवण्याची आणि त्यासंबंधीचे धोके ओळखण्यासाठी सक्षम नियामक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आयएमएफने व्यक्त केली आहे.

'एआय'च्या वाढत्या वापरामुळे सायबर सुरक्षेचे आव्हानही अधिक गंभीर होत असल्याचे 'आयएमएफ'ने म्हटले आहे. आर्थिक संस्थांवरील सायबर हल्ले रोखण्यासाठी विविध देशांमधील माहितीची देवाणघेवाण, तांत्रिक सहकार्य आणि संयुक्त सुरक्षा उपाय अधिक मजबूत करण्याची गरज असल्यावरही भर देण्यात आला आहे. 'आयएमएफ'ची ही सूचना भारतासाठीही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. भारतात सरकार, बँका आणि वित्तीय नियामक संस्था कर्जपात्रता मूल्यांकन, फसवणूक ओळखणे, ग्राहक सेवा आणि नियामकीय देखरेख यांसारख्या क्षेत्रांमध्ये एआयचा वापर वेगाने वाढवत आहेत. याचबरोबर एआयशी संबंधित संभाव्य धोक्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीही विविध उपाययोजना सुरू आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या रेग्युलेटरी सँडबॉक्स उपक्रमांतर्गत बँका आणि फिनटेक कंपन्यांना नियामकांच्या देखरेखीखाली 'एआय'-आधारित वित्तीय उत्पादने आणि सेवांची चाचणी घेण्याची परवानगी दिली जाते. 'रिझर्व्ह बँक इनोव्हेशन हब'ने विकसित केलेली 'म्युल हंटर एआय' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली व्यवहारांचे विश्लेषण करून सायबर गुन्ह्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या बनावट किंवा 'म्युल' बँक खात्यांची ओळख पटवते. 'आयएमएफ'च्या मते, एआयमुळे कुशल मनुष्यबळाची कमतरता काही प्रमाणात भरून काढता येऊ शकते; मात्र या तंत्रज्ञानाचा प्रभावी आणि सुरक्षित वापर करण्यासाठी उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य आवश्यक आहे. भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये अशा तज्ज्ञांची उपलब्धता अद्याप मर्यादित असल्याने ही बाब भविष्यातील मोठे आव्हान ठरू शकते. 'एआय' वित्तीय क्षेत्रासाठी मोठी संधी घेऊन आले असले, तरी जोखमींचे व्यवस्थापन तितकेच महत्त्वाचे आहे. नवकल्पनांना चालना देतानाच मजबूत नियमन, सक्षम सायबर सुरक्षा, तांत्रिक कौशल्य आणि मानवी देखरेख यांचा समतोल राखला, तरच 'एआय'चा लाभ आर्थिक व्यवस्थेला दीर्घकालीन आणि सुरक्षितरीत्या मिळू शकेल.

गेल्या काही आठवड्यांपासून सातत्याने वाढणाऱ्या मसाल्यांच्या किमतींना आता तात्पुरता ब्रेक लागला आहे. या आठवड्यात हळद, धने आणि जिऱ्याच्या दरात घसरण झाली असून त्यामागे नफावसुली आणि सुधारलेला मॉन्सून ही प्रमुख कारणे असल्याचे कमॉडिटी बाजारातील तज्ज्ञांनी सांगितले आहे; मात्र दीर्घकालीन दृष्टीने मसाल्यांच्या किमती पुन्हा वाढू शकतात, असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला आहे.'नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज एक्स्चेंज' (एनसीडीईएक्स) वरील व्यवहारानुसार, हळदीचा २० जुलै रोजी प्रति क्विंटल २१ हजार ४९२ रुपयांवर बंद झालेला भाव २४ जुलैपर्यंत घसरून २० हजार ७२० रुपये या दिवसातील नीचांकी पातळीवर पोहोचला. धने प्रति क्विंटल १६ हजार २९८ रुपयांवरून १५ हजार ४६० पर्यंत खाली आले. जिरे प्रति क्विंटल २१ हजार २८५ रुपयांवरून २० हजार ९५० रुपयांपर्यंत घसरले. कमोडिटी तज्ज्ञ आणि 'अॅग्रोकॉर्प इंटरनॅशनल'चे संशोधन प्रमुख इंद्रजीत पॉल यांच्या मते, गेल्या महिनाभरात मसाल्यांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली होती. केवळ हळदीच्या दरात एका महिन्यात सुमारे पाच हजार रुपये प्रति क्विंटल वाढ झाली होती. त्यामुळे व्यापाऱ्यांनी नफावसुली केल्याने दरात काहीशी घसरण झाली. धने आणि जिऱ्याच्या बाबतीतही हाच कल दिसून आला. सलग वाढीनंतर व्यापाऱ्यांनी विक्री वाढवल्याने बाजारातील दर खाली आले. कमॉडिटी तज्ज्ञ रविशंकर पांडेय यांनी सांगितले, की मॉन्सूनची स्थिती सुधारल्याने पुढील हंगामातील उत्पादन घटण्याची भीती काही प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे पुरवठ्याबाबतचा ताण सध्या कमी झाल्याने मसाल्यांच्या किमतींवर दबाव आला आहे. देशातील सार्वजनिक वितरण प्रणाली पूर्णपणे डिजिटल झाली असली, तरी रेशन कार्डांमधील त्रुटी आणि अपात्र लाभार्थ्यांचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे समोर आले आहे. अहवालानुसार, देशातील ९९.८ टक्के रेशनकार्डांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून ९९.३ टक्के लाभार्थींची आधारशी जोडणी करण्यात आली आहे, तरीही २.९१ कोटी रेशनकार्डांमध्ये विविध प्रकारच्या विसंगती आढळून आल्या आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्या (एनएफएसए) अंतर्गत २०.५ कोटी रेशनकार्डे पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असून सुमारे ८० कोटी लाभार्थी या व्यवस्थेशी जोडले गेले आहेत. आधारशी मोठ्या प्रमाणावर जोडणी झाल्यामुळे दुबार, मृत, स्थलांतरित आणि अपात्र लाभार्थींची ओळख पटवणे शक्य झाले. यामुळे ६.७७ कोटी बनावट रेशनकार्डे रद्द करण्यात आली; मात्र त्यानंतरही डेटा शुद्धीकरण मोहिमेत २.९१ कोटी रेशनकार्डांमध्ये विविध प्रकारच्या त्रुटी असल्याचे आढळले. स्थायी समितीने नमूद केले, की सार्वजनिक वितरण प्रणालीचे डिजिटायझेशन वेगाने झाले असले, तरी अनेक राज्यांमध्ये अजूनही जुने सर्व्हर, कालबाह्य सॉफ्टवेअर, विविध यंत्रणांमधील अपुरा डेटा समन्वय आणि रिअल-टाइम डेटा विश्लेषणाचा अभाव आहे. यामुळे लाभार्थींवर देखरेख ठेवणे, धोरणे आखणे आणि अन्नधान्य वितरणाची कार्यक्षमता यावर परिणाम होत आहे. समितीने सरकारला क्लाउड-आधारित आधुनिक 'आयटी' पायाभूत सुविधा, एकात्मिक डेटा प्लॅटफॉर्म आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित डेटा विश्लेषण प्रणाली विकसित करण्याची शिफारस केली आहे. तसेच, डेटाचे नियमित लेखापरीक्षण आणि वेळोवेळी अद्ययावत माहिती ठेवण्यावरही भर देण्यात आला आहे. अहवालात बायोमेट्रिक प्रमाणीकरणामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि कष्टकरी मजूर यांना सर्वाधिक अडचणी येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अनेकदा बोटांचे ठसे जुळत नसल्यामुळे पात्र लाभार्थीनाही रेशन मिळण्यात अडथळे निर्माण होतात. यावर उपाय म्हणून फेस ऑथेंटिकेशनसह पर्यायी ओळख पडताळणी व्यवस्था अधिक सक्षम करण्याची शिफारस समितीने केली आहे, जेणेकरून कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही. अहवालानुसार, 'वन नेशन-वन रेशन कार्ड' योजना आता देशातील सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू झाली आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत २०० कोटींहून अधिक पोर्टेबिलिटी व्यवहार झाले आहेत. त्यामुळे स्थलांतरित कामगार आणि इतर राज्यांमध्ये काम करणाऱ्या लाभार्थींना देशातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून रेशन घेणे शक्य झाले आहे.

चर्चा आजची

# दरडीचे संकट संपेना

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यामध्ये पावसाळ्यात विशेष म्हणजे अतिवृष्टीच्या कालावधीत पुरपरिस्थिती कायमच निर्माण होते. नदी किनारी राहणाऱ्या गावांना याचा फटका बसतो. त्यामध्ये दरडीच संकट असते. रायगड जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ३९२ दरडग्रस्त गावे आहेत. या गांवामधील सुमारे अडीच लाख नागरिकांना दरडीचा धोका असण्याची शक्यता आहे. सध्या रायगड जिल्ह्यातील अनेक गावांतील नागरिकांना स्थलांतरीत करण्यात आले.

रायगड जिल्ह्याला निसर्गाने भरपूर दिले आहे. या निसर्गाच्या सानिध्यात राहण्यावर स्थानिकांसह पर्यटक कायमच भर देतात. उंच डोंगर, हिरवीगार झाडे, पावसाळ्यामध्ये त्या डोंगरांवर वाहणारे पाण्याचे धबधबे कायमच आकर्षण करणारे ठरत असतात. त्यामुळे पावसाळी सहलीचा आनंद कायमच घेतला जातो. परंतू गेल्या काही वर्षात रायगड जिल्ह्यातील डोंगर दिवसेंदिवस दिवस नष्ट होत आहे. विकासाच्या नावाखाली डोंगरच्या डोंगर पोखरली जात आहे. रस्त्याच्या लगत असलेले उंच डोंगर, दुतर्फा असलेली हिरवीगार झाडे गायब झाली आहेत. विकास कामांच्या नावाखाली जेसीबीच्या मदतीने डोंगरांमध्ये उत्खनन केले जात आहे. डोंगराचा भाग ढिसूळ झाला आहे. त्याचा परिणाम पावसाळ्यात अतिवृष्टीमध्ये होण्याची भिती निर्माण झाली आहे. जमीनीची धुप होऊन दगड, माती, व झाडे उन्मळून कोसळण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात डोंगर भागात फिरण्याचा आनंद नष्ट झाला आहे.

गेल्या दहा वर्षात सुमारे चारशेहून अधिक जणांचा दरडीमुळे बळी गेल्याची माहिती समोर येत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये यापुर्वी महाड व पोलादपूर तालुक्यात दरड कोसळून तीनशेहून अधिक जणांचा बळी गेला. काहीजण त्या दरडीखालीच गेले. २०२१ मध्ये महाड येथील तळीये येथे झालेल्या दरडीने ८४ जणांचा मृत्यू झाला होता. २०२३ मध्ये १९ ते २० जूलै मध्यरात्रीच्या सुमारास इरसालवाडी दरड कोसळली. या दरडीमध्ये अनेकांचा मृत्यू झाला. तर काही जण दरडीखाली दबले गेले. रायगड जिल्ह्यामध्ये दरड कोसळण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. डोंगर भागाजवळील नागरिकांना जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये पोलादपूरपासून पनवेलपर्यंत, कर्जत, रोहा, अलिबाग अशा अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली डोंगरांचे खोदकाम केले जात आहे. जमीनीची धुप होऊन दगड, माती, व झाडे उन्मळून कोसळत आहेत. रायगड जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ३९२ दरडग्रस्त गावे आहेत. या गांवीमधील सुमारे अडीच लाख नागरिकांना दरडीचा धोका असण्याची शक्यता आहे. त्यातपोलादपूरमधील १३९, महाडमधील १२२, अलिबागमधील ०९, कर्जतमधील ०५, खालापूरमधील १२, तळामधील ०३, पनवेलमधील ०३, पेणमधील १३, रोहामधील २०, सुधागडमधील ०९, म्हसळामधील १४,श्रीवर्धनमधील १२,मुरूडमधील ०९,माणगांवमधील २२ गावांचा समावेश आहे. अलिबाग तालुक्यातील चिंचोटीसह, सोगाव आदीवासीवाडी, सागाव आदिवासीवाडी, वाडगाव, ताजपूर, जांभूळपाडा, वेलेटवाडी. रोहामधील किल्ले, खारगाव, तिसे, वाळुंजवाडी, कवळठे आदिवासीवाडी, वरसगाव मधली आळी, मेढा, घोसाळे, आरे बुद्रुक, संभे, नादवली, वावेखार, पाले खुर्दे, महादेववाडी, शेणवई आदीवासीवाडी, भागीरथी खार, कुंभोशी. मूरूडमधील सर्वे वावे, सावली, हिलसरडा सोसायटी, चेहेर, फोफळी, मिठेखार, राजपुरी, एकदरा या गावांसह वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात अजूनही पावसाने सुरुवात केली नाही. पावसाची प्रतिक्षा शेतकरी करीत आहेत. मात्र अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामुळे रायगड जिल्ह्यातील ३९२ गावांना दरडीचा धोका निर्माण झाला आहे. अडीच लाख नागरिकांसमोर दरडीचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.दरडीपासून बचाव करण्यासाठी आपत्कालीन विभागाने कंबर कसली आहे. अपदा मित्रांसह रेस्क्यू टीम आदी यंत्रणाशी संवाद साधण्याचे काम करण्यात आले आहे.भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात ३९२ दडरडग्रस्त गावे आहेत. दरडग्रस्त गावांची एकपासून पाचपर्यंत वर्गवारी करण्यात आली आहे. २४० गावांमध्ये सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली बसवण्यात आली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाचवेळी हवामानाची पुर्व सुचना प्रसारित केली जाणार आहे. धोक्याच्या सुचनेसाठी सायरन वाजविले जाणार असल्याचे सांगण्यात आल आहे. आपत्कालीन परिस्थितीत स्थानिकांची मदत मिळावी म्हणून जिल्ह्यातील ६०० अपदा मित्र आणि सखींची मदत घेतली जाणार आहे. यांना प्रशिक्षण देण्यात आले असून शोध, बचावाचे कीट, ओळखपत्र आदी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. दरडीसह पुरपरिस्थितीच्या काळात बचाव कार्य करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने नियोजन केले आहे. जीव मुठीत घेऊन वाचविण्याचा प्रयत्न या दलामार्फत केला जाईल. परंतु दरडीच्या घटना घडू नये यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. जिल्ह्यात यंदा पावसाने जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने सुरुवात केली. अतिवृष्टीच्या काळात दरडग्रस्त गावांतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. पोलादपूर , खालापूर, तालुक्यातील नऊ गावे, वाड्यांमधील ८७ कुटूंबांतील २४० जणांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. यातील काही जण अंगणवाडी, मराठी शाळा मंगिर, समाज मंदिर व नातेवाईकांच्या घरांमध्ये त्यांना निवाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.मात्र हा प्रश्न सोडवण्यास यंत्रणा उदासीन असल्याचे यावरून दिसून येत आहे. महिनाभरापासून या दरडग्रस्त गावांतील नागरिक वेगवेगळ्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात राहत आहेत. त्यांना त्यांच्या हक्काच्या जागेत जाण्यासाठी पाऊस जाण्याची प्रतिक्षा आहे.

लोकसंसद

## राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी!

२३ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्कॉटलंड या देशातील ग्लासगो शहरात भरविण्यात आलेल्या २३ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांची येथील ओव्हीओ हायड्रो इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या एका अत्यंत दिमाखदार आणि रंगतदार सोहळ्याने सांगता झाली. या सोहळ्यात स्कॉटलंडने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा अधिकृत ध्वज आणि मानाचा राजदंड (बॅटन) भारताकडे सुपूर्द केला. पुढील २०३० मधील २४ व्या शतकोत्सव राष्ट्रकुल स्पर्धा भारताच्या अहमदाबाद शहरात होणार आहेत. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्यपदके जिंकून एकूण ३९ पदके पटकावली आणि पदक तालिकेत चौथा क्रमांक मिळविला. यंदाची वैशिष्ट्ये म्हणजे भारताला सर्वाधिक ७ सुवर्णपदके ही बॉक्सिंग खेळाडूंनी मिळवून दिली. अॅथलेटिक्स आणि पॅरा-अॅथलेटिक्स खेळाडूंनी एकूण ३ सुवर्णपदके तर ज्युडो खेळाडूंनी एकूण २ सुवर्णपदके पटकावली. मीराबाई चानूने महिला वेटलिफ्टिंग गटात सुवर्णपदक जिंकून राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदकाची ऐतिहासिक हॅटट्रिक पूर्ण केली. या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने एकूण ३९ पदके जिंकली असली तरी मागील स्पर्धेपेक्षा ही पदक संख्या खूपच कमी आहे. कारण या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधून भारताच्या दृष्टीने हमखास पदके मिळवून देणारे हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, क्रिकेट आणि नेमबाजी यासारखे प्रमुख खेळ वगळण्यात आले होते. त्यामुळे भारताच्या पदक संख्येत घट झाली. या स्पर्धेत भारतीय तिरंगा उंचावणाऱ्या सर्व पदक विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# किशोर कुमार : चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, ठाणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

४ ऑगस्ट

१) श्री. रोहिदास आवचित झांबरे विद्यानगर, अलिबाग, ४-८-१९४६
२) श्रीम.रोहिणी दिनेश शेट अलिबाग, ४-८-१९४६
३)श्रीम.रत्नप्रभा वामन पाटील रामनाथ, अलिबाग ४-८-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

# स्वतंत्र वीज उपकेंद्राची मागणी

## ● वारंवार वीजपुरवठा खंडित; जागेअभावी महत्त्वाकांक्षी प्रकल्प रखडला

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहर आणि तालुक्यात वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, विद्युत दाबाचा सतत कमी-जास्त होणारा खेळ आणि त्यामुळे विस्कळीत होणारा पाणीपुरवठा यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. घरगुती ग्राहक, व्यापारी, उद्योग, शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये तसेच रुग्णालयांनाही या समस्येचा मोठा फटका बसत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर माणगाव येथे स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारणे ही काळाची गरज बनली असून, हा प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.



महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, माणगावसाठी स्वतंत्र वीज उपकेंद्राचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून कंपनी प्रकल्प उभारण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. मात्र उपकेंद्रासाठी आवश्यक असलेली सुमारे पाच एकर जागा अद्याप उपलब्ध न झाल्याने हा महत्त्वाचा प्रकल्प रखडला आहे. शासन अथवा नगरपंचायतीमार्फत जमीन उपलब्ध होताच उपकेंद्र उभारण्याचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, वीज वितरण कंपनीला आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. नगरपंचायत हद्दीतील उपलब्ध जागांचे सर्वेक्षण करून योग्य जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

सध्या माणगाव शहराचा वीजपुरवठा कांदळगाव आणि गोरेगाव येथील वीज केंद्रांवर अवलंबून आहे. वाढता वीजभार, तांत्रिक बिघाड किंवा देखभाल दुरुस्तीमुळे संपूर्ण शहराला वारंवार अंधाराचा सामना करावा लागतो. विद्युत दाबातील चढ-उतारामुळे घरगुती आणि व्यावसायिक विद्युत उपकरणांचे नुकसान होत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने शहरातील पाणीपुरवठाही विस्कळीत होतो. अनेक भागांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प होतात, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो, तर रुग्णालये आणि अत्यावश्यक सेवांवरही त्याचा परिणाम होत आहे.

माणगाव हे रायगड जिल्ह्यातील प्रमुख आणि मध्यवर्ती शहर असून दरवर्षी येथे नवीन वसाहती, व्यापारी संकुले आणि औद्योगिक विकास वेगाने होत आहे. त्यामुळे भविष्यातील वाढती वीज मागणी लक्षात घेता स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारणे अत्यावश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

### तटकरेंकडून दखल

या प्रश्नाची खासदार सुनील तटकरे आणि राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी दखल घेतली असून प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे आणि शासनस्तरावरील मंजुरीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. माणगावच्या विकासासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याने तो तातडीने मार्गी लावावा, अशी एकमुखी मागणी नागरिकांनी केली आहे.



## ‘विकास महामंडळाची स्थापना करा’

**| रोहा | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील शिंपी समाज एकत्र यावा आणि समाजातील समस्या मार्गी लागाव्यात त्याचप्रमाणे गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेता येत नाही, यासाठी शासनाने संतश्रेष्ठ नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावी. तसेच, त्याची त्वरित अंमलबजावनी करावी, अशी मागणी नामदेव शिंपी समाज जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी केली.

रायगड जिल्हा शिंपी समाज सामाजिक संस्था व नामदेव शिंपी समाज इंदापूर यांचे संयुक्त विद्यमाने इ.१०वी व १२वी परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व अन्य विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. तसेच कोकण विभाग तसा इतर भागापेक्षा थोडा आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहे. समाजातील काहींची कापडाची दुकाने आहेत, तर काही कपडे शिवण्याची कामे करतात. त्यांना या महामंडळाचा फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पाच विद्युत खांब कोसळले

**| सुधागड–पाली | प्रतिनिधी |**

पालीतील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिर परिसरात सोमवारी (दि.३) सकाळी सुमारे ८ ते ८.३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे एक विद्युत खांब कोसळला. त्यानंतर डोमिनो परिणाम होऊन सलग पाच विद्युत खांब जमिनीवर कोसळले. सुदैवाने सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर वर्दळ कमी होती. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

ही घटना बल्लाळेश्वर गणपती मंदिराच्या प्रवेशद्वारापासून भक्तनिवासापर्यंतच्या मार्गावर घडली. त्यामुळे मंदिर परिसरात ये-जा करणाऱ्या भाविकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



घटनेची माहिती मिळताच पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पराग मेहता यांनी तात्काळ महावितरण (एमएसईबी) अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली व आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.त्यानंतर महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तात्काळ वीजपुरवठा खंडित करण्यात आला आणि कोसळलेले खांब हटविण्याचे तसेच विद्युत यंत्रणा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

दरम्यान, या अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू करण्यात आली आहे. संबंधित वाहनाची ओळख पटताच त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, पाली पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोधात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया महावितरणकडून सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

## विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य वाटप

**चिरनेर** : को.ए.सो. सेकंडरी स्कूल चिरनेरच्या एसएससी बॅच २००८–०९च्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत रविवारी (दि.२) चिरनेर केळ्याचा माळ येथील प्राथमिक शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, शालेय साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा होता. विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय वस्तू, नवीन गणवेश व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक अँड. प्रविण पाटील अंगणवाडी सेविका, सामाजिक कार्यकर्ते रोशन कातकरी, सामाजिक कार्यकर्ते तुळशीदास कातकरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. एसएससी बॅच २००८–०९, को.ए.सो. सेकंडरी स्कूल, चिरनेरच्या माजी विद्यार्थ्यांनी भविष्यातही समाजोपयोगी आणि शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प याप्रसंगी व्यक्त केला.

# तीन शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप

## ●शिवसेना धोंडखार शाखेचा स्तुत्य उपक्रम



**| चणेरा | प्रतिनिधी |**

शिवसेना धोंडखार शाखेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद शाळा धोंडखार, खैराळे आणि गडबल येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रेरणा देणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि पालकांनी व्यक्त केलेले समाधान हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. यावेळी चणेरा उपविभाग प्रमुख शैलेश सकपाळ, युवासेना उपतालुका प्रमुख सुदर्शन गावडे, शिवसेना शाखाप्रमुख सनी म्हात्रे, खैराळे उपशाखाप्रमुख रामचंद्र गंभे, युवासेना चनेरा विभाग सचिव नितीन ठाकूर, महिला आघाडी उपतालुका प्रमुख मेघा सावंत, माजी सदस्य शाम गोंधळी, माजी सदस्य गणेश गावडे, माजी उपसरपंच महादेव मोरे तसेच शिवसेना कार्यकर्ते सुजित गावडे, रघुनाथ म्हात्रे आणि नारायण गावडे उपस्थित होते.

कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, माजी अध्यक्ष, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हर्षवर्धन सपकाळांकडून ठाकूर कुटुंबियांचे सांत्वन



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील कंठवली येथील ताईबाई महादेव ठाकूर (७२) यांचे नुकतेच निधन झाले. सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक बी. एम. ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ.मनीष पाटील, राजिपचे सदस्य अविनाश ठाकूर त्यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी ठाकूर यांच्या कंठवली येथे निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.



## गरजू, आदिवासी बांधवांना मदत

**रसायनी** : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन अधिनस्त स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाचा दुसरा स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, अलिबाग यांच्या वतीने खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत दुरशेत अंतर्गत मौजे तुकसई येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत जिल्हा परिषद शाळा चिंबोडे व तुकसई येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच दरडग्रस्त तुकसई ठाकूरवाडी येथील आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण तसेच, उत्कृष्ट लेखा आक्षेप नोंदविणाऱ्या लेखा परीक्षकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# वीस हजार सीड बॉलची लागवड

## पाच शाळांनी एकत्र येत दिला वृक्षसंवर्धनाचा संदेश

**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील पाच शाळांनी एकत्र येत पर्यावरण संवर्धनासाठी २० हजार सीड बॉलची लागवड करून एक प्रेरणादायी उपक्रम यशस्वीपणे राबविला. छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी, अभिनव ज्ञानमंदिर खुर्द, सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे आणि गोळेगणी हायस्कूल या पाच शाळांनी संयुक्तपणे हा उपक्रम राबवून हरित रायगडच्या संकल्पनेला बळ दिले.



हा उपक्रम माय ग्रीन सोसायटी, अंधेरी व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने पार पडला. वृक्षसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या अभियानात रायगड जिल्ह्यातील सर्व सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून विविध परिसरात २० हजार सीड बॉलचे रोपण करण्यात आले. येत्या पावसाळ्यात या सीड बॉलमधून हजारो वृक्ष उगवून परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार आहे.

पर्यावरण रक्षण ही काळाची गरज असून, विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. ‘आजचा सीड बॉल म्हणजे उद्याचा विशाल वृक्ष’ हा संदेश देत सहभागी शाळांनी पर्यावरण संवर्धनाची सामाजिक जबाबदारी पार पाडली.

**शहर सोडून गावातच उभारला उद्योग | केतन चव्हाण यांचा प्रेरणादायी निर्णय**

# पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड

**| पाली | प्रतिनिधी |**

सध्याच्या काळात उच्च शिक्षण किंवा नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण भागातील तरुण शहरांकडे धाव घेत आहेत. असे असताना रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील वाफेघर गावातील युवा उद्योजक केतन चव्हाण यांनी मात्र एक वेगळा आणि धाडसी मार्ग निवडला आहे. शहरातील धावपळीचे आणि सिमेंटच्या जंगलातील जीवन सोडून त्यांनी आपल्या मूळ गावीच उद्योग उभारण्याचा प्रेरणादायी निर्णय घेतला आहे.

गावाकडे परतल्यानंतर केतन चव्हाण यां तरुणाने पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देण्याचे ठरवले. यासाठी त्याने व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून गोट फार्मिंगचा (शेळीपालन) यशस्वी व्यवसाय सुरू केला. पडीक जमिनीचा योग्य वापर करत मोठ्या प्रमाणावर आंब्याची लागवड केली. यासाठी केतन ने ‘स्वदेस फाउंडेशन’ची मदत घेऊन व्यवसायाला सुरुवात केली.





पाण्याचे नियोजन आणि शाश्वत शेतीसाठी कृषी विभागाच्या माध्यमातून स्वतःच्या शेतात आधुनिक शेततळे उभारले. या त्रिसूत्रीच्या जोरावर केतनने केवळ स्वतःचा व्यवसायच उभा केला नाही, तर स्थानिक पातळीवर ग्रामीण तरुणांसाठी रोजगार आणि उद्योगाची एक नवी दिशा निर्माण केली आहे. ‘गावात राहूनही मोठी स्वप्ने पाहता येतात आणि निव्वळ मेहनतीच्या जोरावर ती यशस्वीपणे साकारता येतात, हे केतन चव्हाण यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे.’ त्यांच्या या यशस्वी वाटचालीबद्दल वाफेघर व परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील प्रवासासाठी सर्वस्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### चव्हाणांचा प्रवास तरुणांसाठी मार्गदर्शक

**केतन चव्हाण यांचा हा प्रवास आजच्या सुशिक्षित आणि बेरोजगार तरुणांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरत आहे. शहरात जाऊन चाकोरीबद्ध नोकरी करण्यापेक्षा आपल्या गावातच निसर्गाच्या साक्षीनं उद्योग उभारणे शक्य आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. निर्माण झाले आहे.**

# निवडक



## चांदे आदिवासीवाडी शाळेला नवे रूप

**माणगाव** : पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत राजिप शाळा चांदे आदिवासीवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, संपूर्ण रंगरंगोटी, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाचे बांधकाम, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करून कंपनीने सामाजिक बांधिलकी जपली. या विकासकामांमुळे शाळेला आकर्षक व सुशोभित स्वरूप प्राप्त झाले आहे. तर विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित, स्वच्छ व आनंददायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध झाले आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात निजामपूर बीट विस्तार अधिकारी संजय पालांडे, केंद्रप्रमुख महादेव बांगर, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा कविता वालेकर, सदस्य दत्तात्रय पवार, मुख्याध्यापिका नम्रता बडे, उपशिक्षिका प्रतीक्षा होवाळ, अंगणवाडी सेविका चंद्रा पवार, स्वयंपाकी शुभांगी शिंदे, पालक, ग्रामस्थ तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.



## कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे वृक्षारोपण

**चिरनेर** : उरण तालुक्यातील सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वृक्षारोपण उत्साहात पार पडले. काही वर्षांपूर्वी या डोंगरावर एकही झाड नव्हते. मात्र, सारडे विकास मंचाच्या अथक प्रयत्नांतून आज येथे हजारो वृक्ष दिमाखात डोलताना दिसत आहेत. या हरित उपक्रमामुळे ऑक्सिजन पार्क निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले असून, दररोज अनेक पर्यटक येथे भेट देत आहेत. वृक्षारोपण कार्यक्रमानिमित्त निशा प्रितम म्हात्रे (कोप्रोली) यांच्या हस्ते ऑक्सिजन पार्कमध्ये सातत्याने कार्यरत असणाऱ्या १२ महिला मजुरांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. तर बॅचलर ऑफ आर्ट्स इन कलिनरी आर्ट्स हे शिक्षण पूर्ण करून दुबई, चीन, मालदीव, श्रीलंका, कतार व ओमान या सहा देशांमध्ये कार्याचा अनुभव घेऊन परतलेल्या शुभम प्रमोद पाटील यांचा तसेच, उरण पूर्व विभागात २४ तास ॲम्ब्युलन्स सेवा देणारे सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

## आदिवासी वाड्यात रेनकोट वाटप





**माथेरान** : लोकविकास सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील आदिवासी वाड्यात रविवारी (दि.२) रेनकोट वाटपाचा अभिनव सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवांना मदतीचा हात देत संस्थेने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव गवळी, उपाध्यक्ष महेंद्रजी माघाडे, सचिव नंदकुमार अहिरे, खजिनदार गणेश कदम, महेशजी साळवी, सुनिलजी जोशी, माधवराव भंडारी, चंद्रकांत साळुंखे, सुनिता साळुंखे, स्मिता माघाडे यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. हे रेनकोट मा. रमेश महंतो यांनी आपल्या दिवंगत मुलीच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपलब्ध करून दिले. कामाच्या व्यस्ततेमुळे ते कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल जोशी यांनी केले. त्यांनी कोप्रोली परिसरातील आदिवासी समाजाच्या पाणीप्रश्नावर झालेल्या कामाचा आढावा घेत लोकविकास सामाजिक प्रतिष्ठानच्या स्थापनेमागील उद्दिष्टे व समाजहिताचे विविध उपक्रम उपस्थितांसमोर मांडले.

## क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती

**म्हसळा** : कोकण उन्नती मित्र मंडळ मुंबई माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांनी स्थापन केलेल्या वसंतराव नाईक कला,वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयात विकास समिती अध्यक्ष तथा माजी आमदार मुस्ताक अंतुले यांच्या मार्गदर्शनात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी शिक्षकशिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन




**अलिबाग** : उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे २२वे चार दिवसांचे अधिवेशन दि.६ ते ९ ऑगस्ट सिएटल येथील भव्य कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे. भारताच्या सैन्यदलातील वैद्यकीय दलात ३७ वर्षे काम केलेल्या बालरोगतज्ञ ले. जनरल डॉ. माधुरी कानिटकर या अधिवेशनाच्या प्रमुख पाहुण्या असणार आहेत. चाणक्य प्रतिष्ठानचे प्रमुख अविनाश धर्माधिकारी, लेखक निलेश ओक, आणि सुनंदन लेले यांची भाषणे होतील. त्याचबरोबर अमेरिकेतील विविध शहरातील मंडळे एकांकिका, नाटके, संगीताचे कार्यक्रम, ढोल ताशा स्पर्धा, पैठणी फॅशन शो, स्टॅन्ड अप कॉमेडी इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. गाण्याच्या आणि एकांकिकांच्या प्राथमिक स्पर्धेतील विजेत्या गटांची अंतिम स्पर्धा अधिवेशनात होईल. महाराष्ट्रातून डॉ. संजय उपाध्ये यांचा ‘घर करा रे प्रसन्न’ आणि ‘चोवीस तास बिनधास्त’ हा कार्यक्रम, सलील आणि शुभंकर कुलकर्णी यांचा मुलांसाठी गाण्याचा कार्यक्रम, ऑल द बेस्ट, फोक आख्यान ही दोन नाटके आणि प्रशांत दामले, संकर्षण कऱ्हाडे यांचा नाटकातले नाटक हे कार्यक्रम येत आहेत. महाराष्ट्रातील आणि अमेरिकेतील उद्योजकांसाठी भव्य विक्री कक्ष संमेलनात असेल. त्यात पुस्तक विक्रेते (ग्रंथाली), बांधकाम व्यावसायिक, टूर कंपनी, दागिने, मराठी खाद्यपदार्थ, कपडे विक्रेते, विमा कंपन्या आणि धर्मादाय संस्था सहभागी होणार आहेत.

# बल्क ड्रग प्रकल्पाविरोधात लढा

## ।। रासायनिक कारखान्यांना ठाम विरोध; उभारण्यासाठी स्वतंत्र कोर कमिटीची स्थापना

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रोहा आणि माणगाव तालुक्यात डीएमआयसी अंतर्गत प्रस्तावित बल्क ड्रग पार्क (रासायनिक उद्योग प्रकल्प) विरोधातील जनआंदोलनाला आता अधिक संघटित स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या सुमारे ११ ग्रामपंचायतींनी एकत्र येत या प्रकल्पाविरोधात लढा अधिक प्रभावीपणे उभारण्यासाठी स्वतंत्र कोर कमिटी स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रकल्प रद्द होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धारही ग्रामस्थांनी व्यक्त केला. शनिवारी (दि.२) ऑगस्ट रोजी भाले येथील श्रीराम मंदिरात सभापती विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. बैठकीला परिसरातील



ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन स्थापन करण्यात आलेल्या कोर कमिटीत बाधित ११ ग्रामपंचायतींतील सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी, पर्यावरण व रासायनिक उद्योग विषयाचे जाणकार, तसेच शासनस्तरावर कायदेशीर आणि प्रशासकीय लढा देऊ शकतील अशा अभ्यासू व्यक्तींना सहभागी करून घेण्याचा ठराव करण्यात आला.

भविष्यातील सर्व आंदोलन, जनजागृती, निवेदने आणि कायदेशीर पाठपुरावा या कमिटीमार्फत समन्वयाने करण्यात येणार आहे. बैठकीत उपस्थितांनी स्पष्ट केले की, बल्क ड्रग पार्कमधील रासायनिक उद्योगांमुळे पर्यावरण, शेती, जलस्रोत, जैवविविधता आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प परिसरात होऊ दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली. कोर कमिटीने संबंधित शासकीय विभाग, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि अन्य संबंधित कार्यालयांना लेखी निवेदने देऊन या प्रकल्पाला स्थानिकांचा ठाम विरोध असल्याचे अधिकृतपणे कळविण्याचा निर्णय घेतला. तसेच मंत्री भरत गोगावले आणि खा. सुनील तटकरे यांनी स्थानिकांना दिलेल्या आश्वासनानुसार हा प्रकल्प रद्द होईपर्यंत पाठपुरावा करण्याचेही बैठकीत ठरविण्यात आले.

सभेत उपस्थित ग्रामस्थांनी प्रकल्प रद्द होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, रासायनिक कारखाने नकोत अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. संघर्षाची तीव्रता वाढविण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी एकदिलाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीस बाबु खानविलकर, दीपक जाधव, राजाभाऊ रणपिसे, संदीप जाधव, विपुल उभारे, संजय कदम, सुधाकर शेडगे, सुधीर पवार, जनार्दन मानकर, सुनील जगताप, संजय खानविलकर, भागाराम मंचेकर, मारुती धनावडे, मधुकर कोदे, राजाराम गांगण यांच्यासह भाले, पानसई, निजामपूर, कडापे, जामगाव, पहूर, दाखणे, रातवड, भुवन, निलज आणि वावेदिवली या ११ ग्रामपंचायतींतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रसारमाध्यमांचे कौतुक

दरम्यान, बल्क ड्रग पार्कविरोधातील संघर्षाची भूमिका सातत्याने लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या प्रसारमाध्यमांचेही बैठकीत विशेष कौतुक करण्यात आले. संघर्ष समितीच्या आंदोलनाला विविध दैनिकांनी दिलेल्या प्रसिद्धीमुळे जनजागृती झाली, नागरिकांचा सहभाग वाढला आणि आंदोलनाला बळ मिळाले, असे मत व्यक्त करण्यात आले.

# तळ्यात नशा मुक्त युवा अभियान प्रक्षेपण

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे भारत सरकार, महाराष्ट्र शासन तसेच मुंबई विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार मनशा मुक्त युवा- विकसित भारत संकल्प अभियानार्गंत रविवारी (दि.२) ऑगस्ट रोजी युवा कार्य व क्रीडा मंत्रालय नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



एस. व्ही. बंगाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. नसरीन शेख यांनी उपस्थितांचे स्वागत करून नशा मुक्त युवा- विकसित भारत संकल्प अभियान या उपक्रमाची माहिती दिली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नशा मुक्त युवा- विकसित भारत संकल्प अभियान या राष्ट्रीय अभियानाच्या शुभारंभाचा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करून सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. परशुराम अभंगे यांनी उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे आभार मानले.

# कडावमध्ये आयुर्वेदिक आरोग्य तपासणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कडाव येथे मुंबई येथील जोव्हिस हॉस्पिटल आणि माजी आ. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, नारी सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे स्थानिक पातळीवर आयोजन पोलीस मित्र संघटना आणि मानवाधिकार संघटना यांनी केले होते.

वसंत खंडू पवाळी यांच्या स्मरणार्थ आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन बाल दिगंबर गणेश मंदिरात करण्यात आले होते. डॉ. राज सातपुते यांच्या कडून रुग्णांना दर्जेदार आयुर्वेदिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबीर यशस्वी होण्यासाठी शाम पवाळी, चेतन पवाळी, सतीश पवाळी, अरुण दुघड, नजीर शेख , पोलीस मित्र व मानव अधिकार संघटनेचे पदाधिकारी तसेच संदीप पवाळी, सोहेल शेख सहभागी झाले होते.



# अभिजीत दिपके यांचा सत्कार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, यांच्यावतीने सीजेपीचे अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेत आगामी पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रणपत्र प्रदान केले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, मधुकर वैद्य, छबुराव ताके, सुजित ताजने, राकेश खराडे यांनी भेट घेतली.

याप्रसंगी डॉ. आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची वाटचाल, उद्दिष्टे तसेच पत्रकारांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यानंतर अभिजीत दिपके यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आगामी पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले.

## मिलिंद खारपाटील यांची निवड

**उरण :** आगरी सेनेचा ४० वा वर्धापन दिन नुकताच ठाणे येथील गडकरी रंगायतन येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात मिलिंद खारपाटील यांना खा. सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा, खा. नरेश म्हस्के, आ. संजय केळकर, आ. सुलभा गायकवाड, गायक संतोष चौधरी यांच्या उपस्थितीत आगरी सेना प्रमुख प्रदीप साळवी, राहुल साळवी, आगरी सेना रायगड जिल्हा प्रमुख सचिन मते यांच्या हस्ते आगरी सेना पत्रकार संघ रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# आगरी समाज संस्थेतर्फे करिअर मार्गदर्शन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या वतीने आरसीएफ शाळा, कुरुळ येथे इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर व शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूण ८३ विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी आगरी समाज संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली.



शुभांगी म्हात्रे यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने कसे सामोरे जावे, व्यक्तीमत्त्व विकास आणि वेळेचे नियोजन या विषयांवर मार्गदर्शन केले. तर मिलिंद धोदरे यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान इयत्ता ९ वी व ११ वीमध्ये प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच आरसीएफ शाळेचा आगरी समाज संस्थेच्या गौरवचिन्हाने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या सोनचाफ्याच्या रोपारोपणाने करण्यात आली.

याप्रसंगी आगरी समाज संस्थेचे शैक्षणिक उपक्रम प्रमुख मिलिंद धोदरे, शुभांगी म्हात्रे, जयवंत पाटील, अंकुश पाटील, श्रेयस ठाकूर, उदय म्हात्रे, प्रभाकर ठाकूर निलेश पाटील आदी उपस्थित होते.

# पेण येथे प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज पेण येथे तिसरी, चौथीसाठी ३० जुलै ते २ ऑगस्ट या चार दिवसाच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या प्रशिक्षणामध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, नगरपालिका शाळा, शासकीय आश्रम शाळा, खासगी अनुदानित प्राथमिक शाळा आशा एकंदरीत २३० शाळांमधील शिक्षकांनी चार




दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेतले. रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी संजय नाईकडे आणि पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक प्रशिक्षण अतिशय नियोजनबद्ध पार पडले.

पेण पंचायत समितीचे गट समन्वयक निलेश मानकवले, करुणा भोईर, हितेंद्र म्हात्रे, प्रवीण मगर, हर्षदा शेळके यांनी चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण पूर्ण करून घेतले.

## वाघ्रण प्राथमिक शाळेत वक्तृत्व स्पर्धा

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघ्रण येथे शनिवारी (दि.१) ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र पाटील, दिपक पाटील, सुजाता गुंजाळ, शुभदा पाटील आदींनी टिळकांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर मुलांनी भाषणे सादर केली. १५ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी मारणारा ओम पाटीलचा सन्मान करण्यात आला.



**वावोशी-परखंदे ग्रामस्थांनी रोखले काम | निकृष्ट कामाविरोधात लोकआंदोलनाचा इशारा**

# खड्ड्यांत खडी टाकून रस्त्याची डागडुजी

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंर्गत तयार करण्यात आलेल्या वावोशी-परखंदे रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामावर रविवारी ग्रामस्थांनी आक्षेप घेत काम थांबले आहे. पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यांमध्ये थेट खडी टाकून फावड्याच्या सहाय्याने ती पसरवून डागडुजी केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे, हे काम सुरू असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अभियंता अथवा अधिकृत तांत्रिक निरीक्षक घटनास्थळी उपस्थित नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी पावसाळ्यात याच पद्धतीने तात्पुरती डागडुजी केली जाते. काही दिवसांतच खडी वाहून जाऊन रस्ता पुन्हा पूर्ववत खड्डेमय होतो. त्यामुळे ही कायमस्वरूपी दुरुस्ती नसून केवळ थातूरमातूर काम असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. यावेळी वावोशी येथील ग्रामस्थ अजित मोरे, जतिन मोरे, हनुमंत मोरे आणि सतीश शेवाळे यांनी घटनास्थळी जाऊन सुरू असलेल्या कामावर आक्षेप घेतला. तसेच संबंधित विभागाचा अभियंता उपस्थित नसताना आणि कामाची तांत्रिक तपासणी न करता डागडुजी केली जात असल्याचे सांगत त्यांनी काम थांबविण्याची मागणी केली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांचा मोबाईल फोन बंद असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. संबंधित विभागाचा जबाबदार अभियंता प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहावा, वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता तपासावी आणि रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करावे. अन्यथा निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला.

वावोशी-परखंदे रस्त्याच्या निकृष्ट अवस्थेबाबत यापूर्वीही अनेक वेळा तक्रारी, निवेदने आणि वृत्तमाध्यमांद्वारे पाठपुरावा करण्यात आला आहे. त्यामुळे आता संबंधित विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण रस्त्याची तांत्रिक पाहणी करून दर्जेदार व कायमस्वरूपी काम करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> “ माझी बायपास शस्त्रक्रिया झाली असून डॉक्टरांनी खराब रस्त्यावर प्रवास करू नका, असा सल्ला दिला आहे. तरीही या रस्त्यावरून प्रवास करणे भाग पडत आहे. प्रशासनाने आता तरी जागे होऊन नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवावा. अन्यथा दर्जेदार रस्त्यासाठी मी आमरण उपोषण करण्यासही मागे-पुढे पाहणार नाही. ”
>
> – रविंद्र टिळक, सामाजिक कार्यकर्ते

## निवडक



### कर्जतमध्ये रानभाज्या उत्सवाचे आयोजन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील जंगल भागात आढळणाऱ्या रानभाज्या यांचे महत्व मानवी जीवनावर आहे. त्या दृष्टीने रानभाज्यांना मागणी मोठ्या प्रमाणावर असून रानभाज्यांचे महत्व विषद करण्यासाठी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत येथील क्रांतीज्योती आदिवासी महिला सामाजिक संस्था आणि अत्तदीप एज्युकेशन फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील किकवी-बोरवाडी येथे रानभाजी महोत्सव आयोजित केला होता. रानभाज्यांचे संवर्धन, ठाकर कातकरी समाजाच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान तसेच विषमुक्त , रासायनमुक्त नैसर्गिक अन्नाबाबत जनजागृती हा महोत्सवाचा उद्देश ठेवून आयोजित केलेल्या रानभाज्या महोत्सवात असंख्य प्रकारच्या भाज्या मांडण्यात आल्या होत्या. यावेळी अत्तदीप एज्युकेशन फाऊंडेशनच्या डॉ. सुजाता खांडेकर तसेच कृषी सहाय्यक अधिकारी सरडे यांनी कृषीविषयक मार्गदर्शन केले. या रानभाज्या महोत्सवात सुमारे २० आदिवासी वाड्यांतील महिलांनी पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या विविध रानभाज्यांपासून तयार केलेले पौष्टिक आणि पारंपरिक पदार्थांचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



### भारतीय एज्युकेशन सोसायटीत व्याख्यान

**नागोठणे :** भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलातील एस.एस.ओ.एस.पी. डिप्लोमा इंजिनिअरिंग महाविद्यालयातील कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अॅण्ड मशीन लर्निंग विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी उरीशशी Guidance Session on Emerging Programming Languages IT Career Opportunities या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी व्याख्यानादरम्यान विविध शंका विचारून करिअर नियोजन, इंटर्नशिप, प्रकल्प, प्रोग्रामिंग भाषा निवड आणि उद्योग क्षेत्रातील संधी याबाबत मार्गदर्शन घेतले. हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवेश यादव, सागर सुरेकर, स्पृहा तांडेल, प्राध्यापक तसेच कॉम्प्युटर व एआय-अँड-एमएल विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन संबंधित विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले होते.



### आई जोगेश्वरी गोविंदा पथकाचा सरावरंभ

**नागोठणे :** एक गाव एक गोविंदा टॅग लाइन खाली एकत्र आलेल्या आई जोगेश्वरी गोविंदा पथकाच्या सरावाचा शुभारंभ किशोर जैन यांच्या हस्ते रविवारी (दि. २) ऑगस्ट रोजी नागोठण्याची ग्रामदेवता श्री जो-गेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले. या निमित्ताने गेल्या वर्षी पाली येथे मानाच्या दोन दहीहंडी फोडून जिंकलेले दोन भव्य चषक कार्यक्रमस्थळी आकर्षक रित्या सजावट करून त्याठिकाणी ठेवण्यात आल्या होत्या. गेल्या वर्षी पाली येथे धुमाकूळ घालणाऱ्या आई जोगेश्वरी गोविंदा पथकाचा बाल गोविंदा सान्वी राऊत हिच्यासह गोविंदा पथकातील कमिटी व सर्व गोविंदाचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी किशोर जैन, भाई टके, सुप्रिया महाडिक, ज्ञानेश्वर साळुंखे, विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक, बाळासाहेब टके, मोहन नागोठणेकर, सचिन ठोंबरे, संजय पिंपळे, भाविका गिजे, संजय काकडे, अनिल महाडिक, मनोज टके, बिपीन सोष्टे, संतोष चितळकर, प्रसाद जोगत, शेखर जोगत, अॅड. रमेश जाधव, केतन भोय, भरत गिजे, राजेश सुर्वे, स्वप्नील भोसले, संदीप राऊत, प्रविण आमडोसकर, निलेश पिंपळे यांच्यासह गोविंदा पथकाचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे.** टॅली व संगणक ज्ञान आवश्यक मोबाईल नं. ९८५०२९५७५५/८७९६८५५५५५
- **O' NEST Group of Hotels** येथे हाऊसकिपर, वेटर? रेस्टॉरन्ट मॅनेजर तसेच गार्डन व किचन कामासाठी १ जोडपे तातडीने हवे. ठिकाण अलिबाग/रत्नागिरी संपर्क- ९९७५५१६१२३.
- **we are hiring -kokan** estate project-mangofolks (premium UHDP mango project) land surveyor-1, field supervisor (land development)-4, field supervisor (agriculture)-3,Security guards-6, Labour Contractor. Contact-9325437216. Location-mangaon-Raigad.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. विजय हरिश्चंद्र चौरे २. सौ.दर्शना मोरेश्वर देशमुख दोघेही रा. वारे, पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१ यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत जमिन मालक श्रीमती सुनिता वसंत देशमुख आधार नं. ५१५६९२८१००५१ रा. वारे, पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१ यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे- वारे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १९ | २ | एकुण क्षेत्र ००-६५-६० हे. आर.<br>पैकी ००-२५-०० हे. आर. | २=८१ |

सबब वरील मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्ट पोटगी, वारस, भाडेपावती, वहीवाट वा तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध असतील तर आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीखत लिहुन घेणार यांचे वकील यांच्याकडे स्वतः येवुन लेखी कळवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येवुन विदयमान मालकांबरोबर सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०८/२०२६

**ॲडव्होकेट गितेश मोतीराम सावंत**
मु.शिरसे, पो. कोंदिवडे, ता. कर्जत,
जि. रायगड ४१० २०१
मो. नं. ९६८९६८८२७२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमिन/भुखंड मालक श्री. दिलीप जे. काथराणी यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्क, ताबेकब्जातील मौजे कोप्रोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ भुखंड/जमिनीच्या बदल्यात मे. सिडकोच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) नगर रचना योजना - ३ (टी.पी.एस.-३) अंतर्गत वाटप करण्यात आलेला अंतिम भुखंड हा खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. (मुळ भुखंड) | भुखंड क्र. (अंतिम भुखंड) | क्षेत्र चौ.मी.मध्ये |
|---|---|---|---|
| कोप्रोली, ता. पनवेल | १/२/अ<br>१/२/ब<br>१/२/क<br>१/३/अ | ९४ | ६६६१ चौ.मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडाचे आमच्या अशिलांच्या नावे/लाभांत विक्री/हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडावर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहू भुखंडासंदर्भातील खरेदीखत/हस्तांतरणाचा कायदेशीर व्यवहार करुन घेतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही : धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता: शॉप नं.१४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई, ता.आणि जि.ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली फ्लॅट मिळकत तिचे मालक श्री.प्रशांत केदारनाथ मगदुम, रा.काटकर मंगल कार्यालयाजवळ, ब्लॉक नं. बी-८, नाथ रेसिडन्सी, मुरारजी पेठ, सोलापूर-४१३००१ यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मौजे मुद्रे बुद्रुक, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती स.नं.हि.नं. १९/३ अ व ३ ब क्षेत्र ६५२५ चौ.मी. आ १०४४ यावरील 'शिव ओम' कॉम्प्लेक्स या इमारतीमधील बी १-१ (ए) मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.१०४ क्षेत्र, ५९५ चौ.फुट कारपेट.

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ४/८/२०२६

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस.एल.एल.बी.
प्रभात अपार्टमेंट, रूम नं.४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे सरेभाग, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-सरेभाग, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. विश्वास धर्माजी म्हात्रे<br>२. नंदा शंकर म्हात्रे मयत तर्फे वारस<br>२/१. कै.उमेश नंदा उर्फ आनंद म्हात्रे<br>२/२. पार्वती नंदा उर्फ आनंद म्हात्रे<br>२/३. गणेश नंदा उर्फ आनंद म्हात्रे<br>२/४. कै.दिनेश नंदा उर्फ आनंद म्हात्रे मयत तर्फे वारस<br>२/४/१ जयश्री दिनेश म्हात्रे<br>२/४/२ आशुतोष दिनेश म्हात्रे<br>२/५. सुनिता काशिनाथ सालावकर<br>२/६. शैला नरेश पाटील<br>३. कै.पुष्पा चांगदेव म्हात्रे मयत तर्फे वारस<br>३/१. उज्वल चांगदेव म्हात्रे | ३० | २/अ/२ | ०-३०.९० | ४.८४ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकती संदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा- कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री.विश्वास धर्माजी म्हात्रे वगैरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०४/०८/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को.ऑप हौ. सोसा.
लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक अनिल गेनू उतेकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६२ | १-५९-०० | ०-८१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१०) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०४/०८/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय - कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल
अन्नपूर्णा जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक १.जगदीश गजानन हातमोडे २. नंदकुमार गजानन हातमोडे व ३. संजय गजानन हातमोडे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५३/१९ | ००-५६-०० या एकूण क्षेत्रापैकी<br>००-१८-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ००-५९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०३ ऑगस्ट २०२६

**ॲड.शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे बोर्वे, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे एकुण २ हे. - ०० आर ०० चौ.मी. क्षेत्रापैकी श्रीमती ललिता निलेश म्हात्रे यांचे हिस्स्याची ० हे.-२० आर ०० चौ.मी. क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे- बोर्वे, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| मणिराम परशुराम म्हात्रे<br>ललिता निलेश म्हात्रे<br>भीमसेन विठोबा म्हात्रे | १८२ | २ | २-००.००<br>पैकी ०-२०.०० | ३०.००<br>३.०० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण - दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम. ओ. यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती ललिता निलेश म्हात्रे हिचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०४/०८/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को. ऑप हौ. सोसा.
लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बारशिव, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बारशिव ता.मुरुड | १५१ | जिरायत १-९३-००<br>पो.ख.०-४८-००<br>२-४१-०० | १.५६ |

वर वर्णन केलेली संपूर्ण जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक १) श्री. प्रकाश नंदलाल चावला आणि २) सुनील नंदलाल चावला यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारीही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक : ०३/०८/२०२६
मोबा.नं.९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस- लक्ष्मीनारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

प्रोसेस जमा रू./-

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मा. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात,**

दिवाणी चौकशी अर्ज ७४/२०२६
नि. क्र. ७/ड

श्री. देवेश हेमचंद्र राजे वगैरे ...अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

ज्याअर्थी कै. हेमचंद्र लक्ष्मण राजे, हे पेण येथे तारीख २४/०६/२०२५ रोजी मयत झाले असून त्यांचे नावे पेण नगरपरिषद हद्दीतील दर्शन बिझिनेस पार्क-१, (दुकान गाळे क्रमांक ९ व १३) मालमत्ता क्रमांक PENN०००१७३८२ व (दुकान गाळा क्रमांक १५/NEW,G.N. १०) मालमत्ता क्रमांक PENN०००१९४८२ हे दुकान गाळे, पेण नगरपरिषद हद्दीतील 'स्वामीराज' (सदनिका क्रमांक २ व १) मालमत्ता क्रमांक PENN०००००१०० (जुना मालमत्ता w1z२०००१०६) ही निवासी इमारत पेण नगरपरिषद हद्दीतील मालमत्ता क्रमांक PENN०००००५२७ ही शिवकमल सहकारी गृहनिर्माण संस्था, पेण येथील सदनिका क्रमांक बी ३१ ची मिळकत, जिल्हा रायगड तालुका पेण पैकी पेण नगरपरिषदेचे हद्दीतील सर्व्हे नंबर २६६ हिस्सा नंबर १ या बिनशेती योजनेपैकी बिनशेती भूखंड क्रमांक ७ व ८ या मिळकती, जिल्हा पुणे, तालुका मुळशी पैकी गाव वाकड येथील टोपाझ पार्क को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड येथील निवासी सदनिका क्र.६०१ ची सदनिका, पेण येथील वर्षा वाईन्स या चारूच्या दुकानाकरिता काढलेले लायसन्स या स्थावर मिळकती व बँक ऑफ बडोदा, शाखा पेण येथे सेवयोग अकाउंट नंबर ०४३३०१००००५४३ या खात्यामधील रक्कम व बँक ऑफ बडोदा, शाखा पेण या बँकेत पेन्शन अकाउंट नंबर ०४३३०१०००१४०६१ पा खात्यामधील रक्कम या जंगम मिळकती कै. हेमचंद्र लक्ष्मण राजे यांच्या मालकीच्या आहेत. सदर मिळकतीकरिता हेमचंद्र लक्ष्मण राजे यांचे पश्चात अर्जदार देवेश हेमचंद्र राजे आणि निलेश हेमचंद्र राजे हे दोघेही कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेकरिता अर्जदार यांनी अलिबाग कोर्टात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सबब तसा वारस दाखला देणेसंबधी कोणाच्या काही हरकती असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा तारीख ३१/०८/२०२६ रोजी कोर्टामध्ये हजर होवून लेखी स्वरुपांत मे कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदार यांस वारस वर नमूद मिळकतीकरिता दाखला दिला जाईल. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाने सहीनीशी दिली.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बारशिव, ता. मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बारशिव ता.मुरुड | १५४ | जिरायत ०-९७-४०<br>पो.ख. ०-२२-६०<br>१-२०-०० | ०.७८ |

वर वर्णन केलेली संपूर्ण जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. विवेक मनोहर लुथारिया यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/०८/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मीनारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

दिनांक : ०४ ऑगस्ट २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| मिनल नितीन पंडीत | ७७ | ४ | ४४२.०० | ४४-२० |

त्यावर बांधलेला बंगला ज्याचे क्षेत्र १२४.२१ चौरस मीटर बिल्टअप मात्र.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-०४/०८/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक सायली चंद्रकांत शिगम व शुभांगी चंद्रकांत शिगम यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| किहिम | २९४ | ०-३८-७०<br>पो.ख. ०-०५-००<br>०-४३-७० | ३.२३ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ४/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - तिवरे, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| सुंदराबाई तुकाराम श्रीखंडे | ५९ | ५ | ०-२९-३० | ५-८० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०३/०८/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मैनाबाई शिवराम कुंभारकर, आत्माराम हरिभाऊ म्हात्रे, परशुराम हरिभाऊ म्हात्रे, सुरेखा विलास म्हात्रे यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले असून या व्यवहाराची जाहिर नोटीस विद्यमान मालक यांच्या संमतीने देण्यात येत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे पाले ब्रुद्रूक, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड**

| शेतकऱ्याचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मैनाबाई शिवराम कुंभारकर,<br>आत्माराम हरिभाऊ म्हात्रे,<br>परशुराम हरिभाऊ म्हात्रे,<br>सुरेखा विलास म्हात्रे | ४९/१/क | ०-३४-९०<br>पोख. ०-०३-८०<br>एकूण ०-३८-७०<br>पैकी ०-२०-०० | ७.२५ |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबेकब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकती बाबत अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनेस मेहर, कर्ज वैगरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तिंना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधिच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत आणुन द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : ०३/०८/२०२६

**ॲड. एच.जे.शेळके**
पत्ता-स्वरांजली हौसिंग सोसायटी,
तळ मजला, सदनिका क्रं.१०२,
रूपाली सिनेमाजवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६.
मोबा.नं. ९८२०३८६७५१

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.मिलिंद विश्वनाथ नागवेकर, श्री.दिलीप विश्वनाथ नागवेकर, श्री.शुभम राजेश म्हात्रे व श्रीमती श्रुतिका प्रफुल म्हात्रे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग, जि.रायगड | १८१५/३ | बागायत ०-०६-०० | १.४० |

अलिबाग,
दि. ०३/०८/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
Office: Ruturaj Plaza, Flat No. 1,
Ground Floor, Shivaji Chowk,
Near Gawade Optics, Alibag, Raigad 402 201.
Contact No. : 09850042234 / 7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे कामार्ले भुमापन क्र.१४३/३ क्षेत्र ००-२४-०० हे.आर. या मिळकतीमधून श्री.भरत पांडूरंग पाटील याचे मालीचे मौजे कामार्ले भुमापन क्र. १४३/२ क्षेत्र ००-२३-०० हे. आर क्षेत्रामध्ये जेणे-येणे करीता कायमस्वरूपी रस्ता असलेबाबत अलिबाग दिवाणी दावा क्र.८०/२००० व दिवाणी अपील क्र. १३०/ २०१४ मध्ये जाहीर केले आहे.

दिवाणी दावा क्र. ८०/२००० व दिवाणी अपील क्र.१३०/२०१४ चा आदेश कामार्ले भुमापन क्र.१४३/३ चे खरेदीदारावर बंधनकारक राहणार आहे. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- ०३/०८/२०२६

**श्री.भरत पांडूरंग पाटील**
रा. चकाला, मुंबई.
मोबाईल ९८२०५४८०११

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल ब्रिज कुमार वर्मा रा.कामोठे पनवेल हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक सौ.अस्मिता आनंद आचार्य रा.पनवेल हिचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - आंबिवली, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ३७/४ | ०-२८-०० | ०-१२ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/०८/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## निवडक

### बृजभूषण सिंह यांची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली :** महिला कुस्तीपट्टूंच्या लैंगिक शोषण प्रकरणी बृजभूषण सिंह यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी त्यांना दोषमुक्त करत असल्याचं म्हटलंय. सोमवारी दिल्लीतील राउज अव्हेन्यू कोर्टाने याबाबत अंतिम निकाल दिला. बृजभूषण शरण सिंह हे गेल्या तीन वर्षांपासून या प्रकरणी जामीनावर बाहेर होते. महिला कुस्तीपट्टूंनी बृजबूषण सिंह यांच्यासह विनोद तोमर यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. त्यांच्यावर पोक्सोअंतर्गत दाखल असलेला गुन्हा याआधीच रद्द ठरवण्यात आला आहे. आता लैंगिक छळाच्या प्रकरणातूनही निर्दोष मुक्तता झाल्यानं बृज़भूषण सिंह यांना दिलासा मिळाला आहे.भाजप नेते असलेले बृजभूषण सिंह हे सहा वेळा खासदार होते. भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष होते. वादात अडकल्यानंतर भाजपने २०२४च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचं तिकीट कापलं होतं. त्यांच्या जागी मुलगा करण भूषण सिंह कैसरगंजमधून विजयी झाला होता.कोर्टाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांनी म्हटलं की, मी आधी जे बोललो ते सिद्ध झाल आहे. आता न्यायालयाच्या सविस्तर आदेशाची वाट बघतोय. सुरुवातीपासून तक्रारदारांच्या जबाबात विरोधाभास होता हे सांगत होतो असंही बृजभूषण म्हणाले.भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप करण्यात आले होते. कायदेशीर प्रक्रियेनंतर ३ ऑगस्ट २०२६ला न्यायालयाने निर्णय दिला. या प्रकरणी जानेवारी २०२३मध्ये कुस्तीपट्टूंनी जंतर मंतरवर आंदोलन करत वाचा फोडली होती.

### पुण्यात टेबल टेनिसचा महासंग्राम!

**पुणे :** डॉ. विद्या मुळ्ये व पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने आयोजित डॉ. प्रमोद मुळ्ये स्मृती करंडक मास्टर्स महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत महिला गटात रंजना पत्की, सुहासिनी बाकरे, स्वाती आघरकर यांनी, पुरुष गटात सुबोध देशपांडे याने विजेतेपद संपादन केले. डेक्कन जिमखाना क्लब व शारदा टेबल टेनिस हॉलमध्ये आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत ७० ते ७५ वर्षांवरील महिला गटात अंतिम लढतीत पुण्याच्या रंजना पत्की हिने आपली शहर सहकारी वीणा जोशीचा १२-१०,११-५,११-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.६५ वर्षांवरील महिला गटात अंतिम लढतीत पुण्याच्या सुहासिनी बाकरेने मुंबई शहरच्या उज्वला मराठेचा ११-४,११-६,११-६ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. ६० वर्षांवरील महिला एकेरीत नाशिकच्या स्वाती आघरकरने ठाण्याच्या मनिषा प्रधानचा ६-११,१३-११,११-८,६-११,१२-१० असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. ८० वर्षांवरील पुरुष गटात अंतिम लढतीत पुण्याच्या सुबोध देशपांडे याने ठाण्याच्या झरीर खंडियाचा ११-४,११-५,११-९ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेचे उद्घाटन स्पर्धेच्या प्रायोजक डॉ. विद्या मुळ्ये यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संयोजन सचिव पराग मोकाशी, स्पर्धा संचालक अविनाश जोशी, डेक्कन जिमखानाचे वित्तीय विभागाचे सचिव गिरीश इनामदार, पीडीटीटीएचे अध्यक्ष राजीव बोडस, उपाध्यक्षा स्मिता बोडस, सचिव श्रीराम कोनकर, खजिनदार आशिष बोडस, वेटरन कमिटी सदस्या मनिषा बोडस आदी मान्यवर उपस्थित होते.

# लव्हलीनाचा देशप्रेमी पंच

- **रेस्टॉरंटने भारताच्या नकाशात ईशान्य-काश्मीर वगळले**
- **नाराजीनंतर माफी मागितली; नकाशा सुधारण्याचे दिले आश्वासन**






लवलीना बोरगोहेन भारताचा नकाशा पाहिला त्यावर भारताचा पूर्वोत्तर भाग दाखवला नव्हता. त्यामुळे लवलीना बोरगोहेन हिचा संताप झाला. तिने तात्काळ रेस्टॉरंटमध्ये आपला निषेध नोंदवला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यात तिने हातात माईक घेऊन जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. कृपया वाईट वाटून घेऊ नका. आपला पूर्वोत्तर भाग भारताच्या नकाशावर नाही, याचे मला थोडे वाईट वाटते. बाहेरही तसेच आहे, आपला पूर्वोत्तर भारत काढला आहे. कृपया भविष्यात याबाबत काळजी घ्या. लवलीना बोरगोहेनच्या कृतीचं सोशल मीडियावर कौतुक होत आहे.

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

ग्लासगोमधील एका भारतीय रेस्टॉरंटने भारताच्या नकाशातून ईशान्य भारताला वगळल्याबद्दल माफी मागितली आहे. ऑलिम्पिक पदक विजेती भारतीय बॉक्सर लव्हलीना बोरगोहेनने हा मुद्दा उपस्थित केला होता, त्यानंतर रेस्टॉरंट व्यवस्थापनाने नकाशा दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले आहे.

ही घटना ग्लासगोमधील रिस्टर सिंग इंडिया, द होम ऑफ करी या रेस्टॉरंटमध्ये घडली. भारतीय बॉक्सिंग संघ २०२६ च्या कॉमनवेल्थ गेम्समधील ऐतिहासिक कामगिरीनंतर तिथे डिनरसाठी पोहोचला होता. या खेळांमध्ये भारतीय बॉक्सरनी सात सुवर्ण आणि तीन रौप्य पदकांसह एकूण १० पदके जिंकली होती.

आसामची रहिवासी आणि ग्लासगोमध्ये रौप्य पदक जिंकणाऱ्या लव्हलीनाने पाहिले की रेस्टॉरंटच्या नॅपकिनवर आणि बाहेर लावलेल्या लोगोवर छापलेल्या भारताच्या नकाशातून ईशान्येकडील भाग गायब आहे. तिने तात्काळ रेस्टॉरंट व्यवस्थापनासमोर हा मुद्दा उपस्थित केला. लव्हलीनाने इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, रेस्टॉरंटमधील काही लोकांनी तिला सांगितले की नॅपकिन आणि लोगोवर छापलेल्या नकाशात ईशान्येकडील भाग गायब आहे आणि काश्मीरचा भागही योग्य नाही. तिने सांगितले की, हे पाहून तिला खूप वाईट वाटले आणि तिने मालकांसमोर आपली बाजू मांडली. रेस्टॉरंट मालकांनी स्पष्टीकरण दिले की, हा ब्रिटिश नकाशा आहे, त्यामुळे ईशान्येकडील भाग गायब आहे. त्यांनी आपल्या चुकीबद्दल माफी मागितली आणि नकाशा बदलण्याचे आश्वासन दिले.

२०२१ ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या लव्हलीनाने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करून सांगितले की, हा मुद्दा तिला वैयक्तिकरित्या का प्रभावित करतो. ती म्हणाली की, ईशान्येकडील असल्यामुळे तिला याचा खूप त्रास होतो. तिने लोकांना विनंती केली की, पुढच्या वेळी या गोष्टीची काळजी घ्यावी.

जेवणाच्या वेळी उपस्थित असलेल्या बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजय सिंह यांनी सांगितले की, रेस्टॉरंट मालकांशी कोणताही वाद झाला नाही आणि प्रकरण शांततापूर्ण मार्गाने सोडवण्यात आले. त्यांनी पीटीआयला सांगितले की, ही एक चूक होती, जी त्यांनी आणि लव्हलिनाने निदर्शनास आणली होती. मालकांनी आपली चूक मान्य केली आहे आणि ती दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले आहे.

भारतीय संघाने शनिवारी आपल्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी या रेस्टॉरंटला भेट दिली होती.

### भारताला मिळाले २०३० चे यजमानपद

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

ग्लासगो राष्ट्रकुल खेळांच्या समारोपाने, भारताने जगाला अहमदाबादला भेट देण्याचे भव्य आमंत्रण दिले आहे. समारोप सोहळ्यात भारताचे प्राचीन तत्त्वज्ञान, आधुनिक कला आणि सांस्कृतिक भव्यता यांचा अनोखा संगम पाहायला मिळाला, आणि यासोबतच २०३० मध्ये अहमदाबाद येथे होणाऱ्या खेळांच्या शताब्दी आवृत्तीच्या प्रवासाची अधिकृतपणे सुरुवात झाली.

रविवारी २०२६ च्या समारोप सोहळ्यात ग्लासगोने राष्ट्रकुल खेळांची सूत्रे भारताकडे सुपूर्द केली. संगीत आणि नृत्याने गुंफलेल्या एका अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रमाने, परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम असलेल्या देशाची ओळख अधोरेखित केली. अंतिम सादरीकरणात, शंकर महादेवन आपल्या मुलांसोबत, सिद्धार्थ आणि शिवम, मंचावर परतले आणि त्यांनी सुनो गौर से दुनिया वालों, भाग मिल्खा, ए वतन मेरे वतन आणि लहरा दो यांसारखी भारतातील काही सुपरहिट गाणी सादर केली. गुजराती पार्श्वगायिका भूमी त्रिवेदी यांनी यजमान राज्याच्या वतीने एक विशेष सादरीकरण केले.

# वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप

## स्वरांगी मोरेला सुवर्ण पदक

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नेपाळमधील बुढानीलकंठ येथे थर्ड वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा ३० व ३१ जुलै रोजी संपन्न झाली. यामध्ये भारत आणि नेपाळसह ११ देशांचे खेळाडू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत रोहा येथील स्वरांगी मोरे हिने सुवर्ण पदक पटकावून रोहा शहरासह रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कुमारी स्वरांगी मोरे ही रोहा येथील वकील भाग्यश्री मोरे यांची मुलगी आहे. नेपाळ मिक्स बॉक्सिंग असोसिएशन यांच्याकडून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नेपाळ मधील बुढानीलकंठ, काठमांडू मधील मितेरी स्पोर्ट्स क्लब येथे संपन्न झालेल्या या वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप



स्पर्धेत भारत, नेपाळ, बांगलादेश, अझरबैझान, श्रीलंका यांसह एकूण ११ देश सहभागी झाले होते. यापूर्वी आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या सागर धनाजी शेलार याने नेपाळमध्ये सुवर्णपदक जिंकले होते आणि भारतीय संघाने एकूण ६३ पदके मिळवली होती.

स्वरांगी मोरे हिला नेपाळ येथे झालेल्या वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये गोल्ड मेडल मिळाले आहे. थर्ड वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप या जागतिक स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणाऱ्या स्वरांगीला तिचे मार्गदर्शक आणि सहकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्वरांगी मोरे थर्ड वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पदक मिळविल्याने स्वरांगीचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

### आकिब नबीला भारतीय टेस्ट संघात संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय कसोटी संघात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या जागी आकिब नबीला संघात समाविष्ट करण्यात आले आहे.यापूर्वी रविवारी मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह गुडघ्याच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही आणि तो मालिकेतून बाहेर पडला आहे.बुमराहला डाव्या गुडघ्याचा त्रास आहे. संघ व्यवस्थापन आणि बीसीसीआयने त्याच्या दीर्घ कारकिर्दीचा विचार करून कोणताही धोका न पत्करण्याचा निर्णय घेतला आहे. श्रीलंकेविरुद्धची दोन कसोटी सामन्यांची मालिका १५ ऑगस्टपासून गॉलमध्ये सुरू होईल.

## रबर बॉल क्रिकेट स्पर्धा
# अरबाज इलेव्हन मोहल्ला फायटर विजेता



**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोह्यात आयोजित तीन दिवसीय जिल्हास्तरीय रबर बॉल क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत एकूण २४ संघानी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात अरबाज इलेव्हन मोहल्ला फायटर या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

श्री धावीर रोड येथील रॉयल्स मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत उप विजेता म्हणून गावदेवी रोठ संघ तर खारपट्टी इलेव्हन संघाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस वितरण रोहा नगर पालिकेचे गट नेते महेंद्र गुजर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तजम्मूल डबीर, अमीन तूळवे, फैजान शेख,अकिब महाडकर आदी जण उपस्थित होते.

### ख्रिस्तियानो रोनाल्डोचा लग्नास होकार

**। पोर्तुगीज । वृत्तसस्था ।**

फुटबॉल स्टार ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि त्याची पार्टनर जॉर्जियन रॉड्रिग्स लग्नबंधनात अडकणार आहेत. रोनाल्डोचा जन्म झालेल्या मादेरा या सुंदर पोर्तुगीज बेटावर हे जोडपे विवाहबंधनात अडकण्याची तयारी करत आहे. रोनाल्डो किंवा जॉर्जियाना या दोघांनीही लग्नाची तारीख किंवा ठिकाण अधिकृतपणे जाहीर केलेले नाही. पण मीडियामध्ये त्याच्या लग्नाची तारीख आणि ठिकाण जाहीर करण्यात आलं आहे. हे जोडपं ८ ऑगस्टला लग्न बंधनात अडकणार आहे. मादेइराची राजधानी फुनशाल येथील ऐतिहासिक फुनशाल कॅथेड्रलमध्ये लग्न गाठ बांधणार असल्याचं बोललं जात आहे.

## कॉमनवेल्थ टेबल टेनिस स्पर्धा
# पनवेलच्या स्वस्तिका घोषची सुवर्ण झेप!

**। खांदा कॉलनी । वार्ताहर ।**

कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पनवेलच्या स्वस्तिका घोष हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावून देशासह पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे क्रीडाविश्वात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गंगाराम ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात इंग्रजी विषयाची पदवी शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रात सातत्याने मेहनत घेत तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कॉमनवेल्थ स्पर्धेतील सुवर्णपदक हे तिच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे फलित मानले जात आहे.


स्वस्तिकाच्या या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, क्रीडा विभाग तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी तिचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पनवेलच्या नागरिकांनीही तिच्या या यशाचा अभिमान व्यक्त करत भविष्यात आणखी मोठी कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### मैदान गाजवण्यासाठी वैभव सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने भारताच्या आगामी दौऱ्यासाठी आपल्या १६ सदस्यीय १९ वर्षांखालील पुरुष संघाची घोषणा केली आहे. पुढील महिन्यात, भारत आणि ऑस्ट्रेलियाचे ज्युनियर संघ तीन एकदिवसीय आणि दोन चार दिवसीय सामन्यांची मालिका खेळतील. या मालिकेतील सर्वात मोठे आणि रोमांचक आकर्षण म्हणजे १५ वर्षीय भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशीची कामगिरी असेल. अगदी लहान वयात आपल्या आक्रमक फलंदाजीने खळबळ माजवणाऱ्या वैभवला या मालिकेत भारताकडून खेळण्याची संधी मिळू शकते. अलीकडेच, वैभव सूर्यवंशीने भारतीय वरिष्ठ संघासोबत झिम्बाब्वेचा दौरा केला होता.

## पंजाब आंतर-जिल्हा स्पर्धा
# अभिषेक शर्माने झळकावले द्विशतक




**आशियाई क्रीडा स्पर्धेच्या संघात समावेश**

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय टी-२० संघ आता सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत मैदानात उतरताना दिसेल. या स्पर्धे दरम्यान सर्व भारतीय चाहत्यांच्या नजरा अभिषेक शर्मावर असतील, ज्याच्यावर संघाला वेगवान सुरुवात करून देण्याची जबाबदारी असेल. अभिषेकने आतापर्यंत ५६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १८७.२४ च्या स्ट्राइक रेटने १६२९ धावा केल्या आहेत. या काळात त्याने २ शतके आणि ११ अर्धशतके झळकावण्याचा पराक्रम केला आहे.

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा सलामीवीर अभिषेक शर्माने पंजाब आंतर-जिल्हा स्पर्धेतील एका एकदिवसीय सामन्यात द्विशतक झळकावले आहे. अमृतसर मेन्स सीनियर संघाकडून खेळताना अभिषेकने तरन तारन मेन्स सीनियर संघाविरुद्ध ही कामगिरी केली. त्याच्या या खेळीमुळे अमृतसर संघाने ५० षटकांत ५०० धावांचा टप्पा ओलांडला.

अभिषेकने या सामन्यात ९१ चेंडूंचा सामना करत २३३ धावांची खेळी केली. त्याने २५० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. आपल्या खेळीदरम्यान त्याने १५ चौकार आणि २५ षटकार मारले. म्हणजेच त्याने केवळ बाउंड्रीच्या मदतीने २०२ धावा केल्या. या सामन्यात अभिषेकच्या द्विशतकामुळे आणि अभय चौधरीच्या ९१ धावांच्या खेळीमुळे अमृतसर मेन्स सीनियर संघाने ५० षटकांत ८ गडी गमावून ५३३ धावांचा डोंगर उभा केला. अलीकडच्या काळात अभिषेक शर्मा भारतीय संघासाठी खराब फॉर्मशी झुंजत होता. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील मागील सात डावांमध्ये त्याला एकही अर्धशतक झळकावता आले नाही. झिम्बाब्वेविरुद्धच्या अलीकडील तीन सामन्यांच्या मालिकेत त्याने १, ८ आणि २ धावा केल्या होत्या.

**डॉ. विनय सांगळे यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सुवर्ण कामगिरी** | **मलेशियातील हॉस्पेक्स मेडिकल क्रिकेट स्पर्धेत मुंबईला विजेतेपद**

# कर्जतकराने फडकवला मलेशियात तिरंगा

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जतचे सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. विनय सांगळे यांनी मलेशिया येथे नुकत्याच पार पडलेल्या हॉस्पेक्स आंतरराष्ट्रीय मेडिकल क्रिकेट स्पर्धेत मुंबईच्या मेडस्केप स्पार्टन्स युनायटेड संघाचे प्रतिनिधित्व करत शानदार कामगिरीच्या जोरावर विजेतेपद पटकावले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे कर्जतच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत कतार, बांगलादेश, मलेशिया तसेच भारतातील मुंबई, दिल्ली, केरळ आणि गोवा येथील नामांकित मेडिकल क्रिकेट संघांनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात मेडस्केप स्पार्टन्स युनायटेड संघाने गोवा संघाचा पराभव करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या विजयात डॉ. सांगळे यांचे योगदान मोलाचे ठरले.

**सहा वेळा राष्ट्रीय सर्वोत्तम गोलंदाज पुरस्कार**

डॉ. विनय सांगळे यांच्या क्रिकेट कारकिर्दीतील सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्यांनी तब्बल सहा वेळा बेस्ट बॉलर (सर्वोत्तम गोलंदाज) हा राष्ट्रीय किताब पटकावला आहे. उदयपूर, बेंगळुरू, पुणे, हैदराबाद, मुंबई आणि नवी मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्यांनी हा मान मिळवला असून, ही कामगिरी करणारे ते मेडिकल क्रिकेटमधील मोजक्या आणि अव्वल गोलंदाजांपैकी एक मानले जातात.

**५६० विकेट्सचा विक्रम**

डावखुरा जादुई फिरकी गोलंदाज अशी ओळख असलेल्या डॉ. सांगळे यांनी आतापर्यंत ५६० हून अधिक विकेट्स घेत फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकविण्याचा उल्लेखनीय पराक्रम केला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी गोलंदाजीमुळे ते मेडिकल क्रिकेट क्षेत्रातील एक विश्वासार्ह आणि धडाकेबाज खेळाडू म्हणून ओळखले जातात. वैद्यकीय क्षेत्रातील जबाबदारी सांभाळत क्रिकेटसारख्या स्पर्धात्मक खेळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करणाऱ्या डॉ. विनय सांगळे यांनी कर्जतचे नाव देश-विदेशात उज्ज्वल केले आहे.




गेली १८ वर्षे कर्जतमधील सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे ऑर्थोपेडिक सर्जन म्हणून रुग्णांची निस्वार्थपणे सेवा करणारे डॉ. विनय सांगळे यांनी आपल्या वैद्यकीय व्यवसायाबरोबरच क्रिकेटची आवडही सातत्याने जोपासली आहे. टेनिस क्रिकेट आणि लेदर क्रिकेट या दोन्ही प्रकारांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

डॉ. सांगळे यांनी यापूर्वी दुबई, श्रीलंका येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धांबरोबरच पाँडिचेरी, बेंगळुरू, विशाखापट्टणम, चेन्नई, गोवा, पुणे, मुंबई, कोल्हापूर, संभाजीनगर, हैदराबाद आणि नाशिक येथे झालेल्या अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपल्या संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कामगिरीचे संपूर्ण देशभर कौतुक होत आहे.

# ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघ भारत दौऱ्यावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पुढील महिन्यात होणाऱ्या भारत दौऱ्यासाठी १६ सदस्यीय १९ वर्षांखालील पुरुष संघाची घोषणा केली आहे. या संघात भारतीय वंशाचा न्यू साउथ वेल्सचा खेळाडू नील पटेल याचाही समावेश करण्यात आला आहे.

हा संघ भारतासोबत राजकोट आणि अहमदाबादमध्ये पाच सामन्यांची मल्टी-फॉर्मेट मालिका खेळणार आहे.न्यू साउथ वेल्सचा रहिवासी असलेला नील पटेल युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स क्रिकेट क्लबकडून खेळतो. त्याची गणना ऑस्ट्रेलियाच्या उदयोन्मुख युवा खेळाडूंमध्ये केली जाते.

हा दौरा चार आठवडे चालेल. यात ऑस्ट्रेलियाचा संघ भारतासोबत तीन ५०-षटकांचे सामने आणि दोन चार दिवसीय सामने खेळेल. हे सामने १३ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान राजकोट आणि अहमदाबादमध्ये आयोजित केले जातील. या संघाची निवड यूथ नॅशनल सिलेक्शन पॅनलने केली आहे, ज्यात ऑस्ट्रेलियाच्या सर्वात प्रतिभावान युवा खेळाडूंना स्थान देण्यात आले आहे.

ऑस्ट्रेलियाई संघाचे मुख्य प्रशिक्षक माजी क्रिकेटपटू टिम नील्सन असतील. नील्सन सध्या डार्विनमध्ये बांगलादेशविरुद्ध क्रिकेट ऑस्ट्रेलिया इलेव्हन कार्यक्रमाची देखरेख करत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)